एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, रविवार २४ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४४, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 244 Marathi - Daily - Pune, 24 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
'CJP'चे व्यवस्थेला थेट आव्हान!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### मला राज्यसभेवर पाठवल्यास समीर भुजबळांना मंत्रिपद द्या

**मुंबई -** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी येत्या ८ जून रोजी निवडणूक होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून या जागेसाठी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा आहे. पण आपल्याला केंद्रात

छगन भुजबळांची मागणी



पाठवल्यास पुतणे समीर भुजबळ यांना राज्यात मंत्रिपद द्यावे, अशी मागणी छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे केल्याचे सूत्रांनी सांगितले. छगन भुजबळ यांनी यापूर्वी लोकसभा आणि राज्यसभेवर जाण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. लोकसभा निवडणुकीच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्वत: त्यांचे नाव सुचवले होते. त्यामुळे यावेळीदेखील भुजबळ यांच्या नावासाठी भाजपा अनुकूल असल्याचे सांगितले जाते. परंतु भुजबळ यांना राज्यसभेवर पाठवल्यास त्यांची येवल्याची जागा रिक्त होणार आहे. त्या ठिकाणी पोटनिवडणूक होईल. या जागेवर लढण्यासाठी समीर भुजबळ यांनी पूर्ण तयारी केली आहे. मात्र ते निवडून आल्यानंतर त्यांना मंत्रिपद मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळेच छगन भुजबळ यांनी राज्यसभेवर जाताना समीर भुजबळ यांना मंत्रिपद देण्याची अटच सुनेत्रा पवार यांना घातली आहे.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर कॉकरोच पार्टी रस्त्यावर आंदोलन करणार! दीपकेचा इशारा

■ मुंबई

**देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या समाजमाध्यमांवरील कॉकरोच जनता पार्टीने सत्ताधाऱ्यांना धडकी भरवली आहे. काही दिवसांतच दोन कोटींहून अधिक सदस्य बनलेल्या या पक्षाने आता नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या मुद्यावर आक्रमक होत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. जर शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला नाही तर कॉकरोच पार्टी रस्त्यावर उतरून आंदोलन करील, असा स्पष्ट इशारा दिपकेंनी दिला आहे.**





**कॉकरोच** जनता पार्टी केवळ ऑनलाईन चळवळ न राहता प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन काम करणार आहे, असे या पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांचे म्हणणे आहे. शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा या निवेदनावर सही करा, असे आवाहन पार्टीने केले आहे. या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळत असतानाच त्यांचे इन्स्टाग्राम अकाऊंट आता हॅक झाले आहे. याआधी त्यांचे एक्स अकाऊंट भारतात बंद करण्यात आले. त्यातच दिपकेंना धमकी देण्यात आली की, भाजपात सामील हो नाहीतर खतम करू. धमकी देणाऱ्याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे.

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला नाही तर रस्त्यावर आंदोलन केले जाईल असे सांगत अभिजित दीपके म्हणाले की, आमच्या आंदोलनाची तुलना नेपाळ किंवा बांगलादेशातील आंदोलनांशी करू नये. तो जेन - झी पिढीचा अपमान ठरेल. शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यावर आमचा भर आहे. हिंसा करणे किंवा अस्थिरता निर्माण करणे हा आमचा उद्देश नाही. आमचा विश्वास केवळ लोकशाहीवर आणि शांततापूर्ण मार्गावर आहे. समाजमाध्यामावर सुरू झालेली ही चळवळ आता प्रत्यक्षात येऊ लागली आहे. ती फक्त जेन-झी पुरती मर्यादित नाही. १६-१७ वर्षांचे विद्यार्थीदेखील सध्याच्या व्यवस्थेविषयी नाराजी व्यक्त करत आहेत. मला दररोज असे व्हिडिओ मिळत आहेत, ज्यात लोक कॉकरोच जनता पार्टीच्या नावाने विविध उपक्रम करताना दिसतात. काहीजण यमुना नदी स्वच्छ करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर काही टी-शर्टवर पक्षाचे लोगो तयार करत आहेत. गाड्यांवर स्टिकर लावत आहेत आणि स्थानिक गटही निर्माण करत आहेत. आम्ही ठरवले आहे की, भविष्यात राजकीय पातळीवर पुढे जायचे असल्यास, सर्वप्रथम लोकांशी चर्चा करून सामूहिक निर्णय घेतले जातील.

**प्रश्न - तुम्हाला समाज माध्यमांवर इतका प्रचंड पाठिंबा मिळतो आहे. त्यावरून तुम्हाला असे वाटते का की, सध्याचे तरुण निराश आहेत. त्यांना बदल हवा आहे?**

**अभिजित दीपके** - हे खरे आहे. आम्हाला जे संदेश मिळत आहे त्यावरून असे म्हणता येईल की, आजचे तरुण खूप नैराश्यात आहेत. त्यांचा केवळ व्यवस्थेवरील विश्वास उडालेला नाही तर सध्याच्या सरकार आणि विरोधी पक्षाबाबतही ते निराश आहेत. आपले मुद्दे कुणीच उचलत नाही, असे त्यांना वाटत आहे.

काँग्रेस पक्षाची नव तरुणांशी नाळ का जोडली जात नाही असे विचारता दीपके म्हणाले की, राजकीय पक्ष आणि तरुण पिढी यांच्यात संवादाची दरी निर्माण झाली आहे. आजचे तरुण पारंपरिक पद्धतीने राजकारण पाहत नाहीत. ते लांबलचक पत्रकार परिषदा पाहत बसत नाहीत. राजकीय पक्षांनी तरुण जिथे सक्रिय आहेत तिथे म्हणजे सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर संवाद साधण्याची गरज आहे. तरुणांना समजेल अशा भाषेत आणि शैलीत त्यांच्याशी संवाद साधण्यात ते अपयशी ठरले आहेत. नीटचे प्रकरण झाले तेव्हा विरोधी पक्ष थंड बसून होता. आमच्यामुळे तो मुद्दा » पान २ वर

## रिझर्व्ह बँकेची सरकारला मदत २.८६ लाख कोटी! विक्रमी लाभांश



**मध्य पूर्वेतील इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे कच्च्या तेलाचे गगनाला भिडलेले दर, अमेरिकन डॉलरसमोर रुपयाची होत असलेली प्रचंड घसरण आणि महागाईचा भडका आदी कारणांमुळे देशाची अर्थव्यवस्था अत्यंत नाजूक अवस्थेत असताना रिझर्व्ह बँकेने केंद्र सरकारला पुन्हा मोठा दिलासा दिला आहे. २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी रिझर्व्ह बँकेने सरकारला २.८६ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश दिला आहे. रिझर्व्ह बँकेच्या इतिहासातील एका आर्थिक वर्षासाठी सरकारला देण्यात आलेला हा सर्वाधिक लाभांश आहे. मात्र, या विक्रमी लाभांशावरून रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकारवर पुन्हा एकदा जोरदार टीका होण्याची शक्यता आहे. सरकारला लाभांश देताना रिझर्व्ह बँकेला काही रक्कम नेहमी स्वत:कडे राखीव ठेवावी लागते. मात्र सरकारच्या दबावामुळे राखीव रक्कम न ठेवता हा लाभांश दिला गेला असेल तर विरोधक त्याविरोधात रान उठवण्याची शक्यता आहे.**

■ मुंबई

**रिझर्व्ह** बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या केंद्रीय मंडळाची बैठक झाली. या बैठकीत सरकारला २.८६ लाख कोटी रुपये लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२४-२०२५ या मागील आर्थिक वर्षामध्ये बँकेने सरकारला २.६९ लाख कोटी रुपये लाभांश दिला होता. यावर्षी त्यामध्ये ६.७ टक्क्यांची घवघवीत वाढ झाली आहे.

भारतासह जगातील सर्व मोठ्या तेल आयातदार देशांना युद्धाचा जबर फटका बसला आहे. ही परिस्थिती आणखी किती काळ राहील याची कल्पना कोणालाही नाही. कारण अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध समाप्तीसाठी चर्चा सुरू असली तरी हे दोन्ही देश आपापल्या अटींपासून तसूभरही हलण्यास तयार नाहीत. त्यामुळे हे युद्ध लवकर थांबेल अशी चिन्हे दिसत नाहीत. इराणने होर्मुज सामुद्रधुनी बंद केली आहे. तर त्याला » पान २ वर

## २७ मेपासून पुन्हा देशव्यापी शेतकरी आंदोलनाची हाक

■ नवी दिल्ली

**देशात** पुन्हा एकदा शेतकरी आंदोलनाच्या हालचाली सुरू झाल्या असून, संयुक्त किसान मोर्चाने २७ मेपासून देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. किमान आधारभूत किंमत, वाढते इंधन दर आणि खतांची कमतरता यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. यावेळी आंदोलन आणखी तीव्र करण्याचे संकेत शेतकरी संघटनांनी दिले आहेत.

२०२१-२२ मध्ये दिल्लीच्या सीमांवर मोठे आंदोलन करणारे संयुक्त किसान मोर्चा हीच संघटनेने पुन्हा सरकारविरोधात आंदोलनाची हाक दिली आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, सरकारची सध्याची किमान आधारभूत किंमत व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताची नाही. शेतीचा खर्च सातत्याने वाढत असताना किमान आधारभूत किमतीमध्ये त्यानुसार वाढ होत नसल्याने शेतकऱ्यांना योग्य फायदा मिळत नाही. खरीप हंगाम २०२६-२७ साठी जाहीर करण्यात आलेली किमान आधारभूत किंमत ही प्रत्यक्ष उत्पादन खर्चाच्या तुलनेत खूपच कमी आहे. कृषी खर्च आणि मूल्य आयोग दरवर्षी किमान आधारभूत किमतीबाबत शिफारशी करतो. मात्र, या प्रक्रियेत शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष खर्च आणि नफा योग्य पद्धतीने विचारात घेतला जात नाही.

## पेट्रोल-डिझेल पुन्हा महागले दहा दिवसांत तिसरी दरवाढ

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**मध्य** पूर्वेतील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या असून, त्याचा थेट फटका भारतीय ग्राहकांना बसला आहे. आज




केंद्र सरकारने पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ केली. मागील दहा दिवसांतील ही तिसरी दरवाढ आहे. पेट्रोल ८७ पैशांनी आणि डिझेल ९१ पैशांनी महागले आहे. दुसरीकडे दिल्ली एनसीआर क्षेत्रात सीएनजीच्या दरात प्रति किलो १ रुपयाने वाढ करण्यात आली आहे. दिल्लीत सीएनजीची ही तिसरी दरवाढ आहे.

ताज्या दरवाढीमुळे मुंबईत पेट्रोलचा दर आता १०७.८७ रुपये तर डिझेलचा दर ९४.३९ रुपये प्रति लीटर झाला आहे. मागील दोन आठवडे इंधनाच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत आहे. सर्वप्रथम १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लीटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा १९ मे रोजी ९० पैशांची वाढ करण्यात आली. आता झालेल्या ताज्या दरवाढीमुळे पेट्रोल-डिझेलच्या किमतींमध्ये एकूण ५ रुपयांची वाढ झाली आहे.




### मुंबई, रायगड, रत्नागिरीत ३ दिवस पावसाचा इशारा

**मुंबई -** राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाने उच्चांक गाठला असतानाच मुंबईसह कोकणातील काही भागांत पुढील ३ तासांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. आज सकाळी ७ वाजता हवामानाचा इशारा जारी करण्यात आला असून मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळू शकतात. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

## विधान परिषदेसाठी महायुतीत जागावाटपावर चर्चा अंतिम टप्प्यात

■ मुंबई

**विधान परिषदेच्या** निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटपाबाबतची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. ९९ टक्के मुद्यांवर एकमत झाल्याची माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील बैठकीत घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महायुतीची महत्त्वाची बैठक आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी पार पडली. या बैठकीला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधान परिषदेच्या जागा पदरात पाडून घेण्यासाठी महायुतीतील घटक पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. एकूण १७ जागांपैकी भाजपा १२, शिंदे गट ३ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला २ जागा देण्याच्या फॉर्म्युल्यावर चर्चा झाली. शिंदे गटाने अधिक जागांवर दावा

**मंत्री बावनकुळेंची माहिती**

सांगितल्याने भाजपा आणि शिंदे गटात स्वतंत्र बैठक झाली. बैठकीनंतर चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुतीसंदर्भातील चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री बसून उर्वरित मुद्यांवर चर्चा करतील. एक-दोन विषय शिल्लक आहेत.

## क्रिकेटपटू अजित आगरकरबाबत स्फोटक माहिती देण्याचा इशारा

■ नवी दिल्ली

**भारतीय** क्रिकेट संघातील एकेकाळी आपल्या विशिष्ट शैलीमुळे गाजलेला लेग स्पिनर एल शिवरामकृष्णन याने माजी क्रिकेटपटू आणि बीसीसीआयच्या निवड समितीचा अध्यक्ष अजित आगरकर याच्या अध्यक्षपदी निवडीबाबत स्फोटक माहिती उघड करण्याचा इशारा दिला आहे.

एल शिवाने एक्स सोशल मीडियावर पोस्ट करून इशारावजा धमकीच दिली आहे. माझ्याकडे अजित आगरकरबद्दल एक स्फोटक माहिती आहे. ती जर मी जाहीर केली, तर लोक मला त्रास देतील म्हणून मी ती बाब उघड करत नाही. एवढेच सांगेन की, एका सुपरस्टारचा यात संबंध आहे. आगरकर निवड समितीचा अध्यक्ष व्हावा ही त्याची इच्छा होती. त्यासाठी त्याने आगरकरला फी व्यतिरिक्त दोन कोटी रुपये दिले होते. मात्र हा सुपरस्टार कोण आणि त्याने आगरकरला दोन कोटी रुपये देऊन काय साध्य केले, याबाबत अधिक तपशील त्याने दिला नाही.

## दक्षिण मुंबईत विजेचा खेळखंडोबा बेस्टचा पुरवठा खासगी कंपनीला देणार?

■ मुंबई

**मुंबईत** ज्या परिसरांत आतापर्यंत कधीही वीज खंडित होण्याचे प्रकार होत नव्हता अशा दादर, वडाळा, पारसी कॉलनी, गिरगाव आणि गावदेवी या भागांत सातत्याने गेला आठवडाभर सात-आठ तास वीजपुरवठा खंडित होत आहे या भागात बेस्ट वीजपुरवठा करते. त्यामुळे हे प्रकार सतत घडवून आणायचे, बेस्टला कुचकामी ठरवायचे आणि शेवटी बेस्टचे विभाग खासगी वीज कंपनीला द्यायचे यासाठी वीजपुरवठा बंद केला जात आहे का, असा सवाल विचारला जाऊ लागला आहे.

काल रात्री गिरगाव परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्याने हा परिसर काळोखात बुडाला. जवळपास सहा तासाने वीजपुरवठा सुरळीत झाला. त्याचवेळी दादरच्या



किंग्ज वे वीज केंद्रात तांत्रिक बिघाड झाल्याने दादर, वडाळा आणि पारसी कॉलनी परिसरात वीजपुरवठा काही काळ खंडित झाला होता. सात दिवसांपूर्वीही दादरला दिवसभर वीजपुरवठा खंडित होता. आज सकाळीही पुन्हा » पान २ वर

## मुंबईत वडापाव ३५ रुपयांवर खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्या

■ मुंबई

**इराण-अमेरिका** तणाव आणि वाढत्या इंधन दरांचा फटका आता थेट सर्वसामान्यांच्या खिशाला बसू लागला आहे. व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर, खाद्यतेल, पाव आणि वाहतूक खर्च वाढल्याने मुंबईसह राज्यभरातील खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्या आहेत. याचा सर्वाधिक परिणाम मुंबईची ओळख असलेल्या वडापावावर झाला असून, आता मुंबईकरांना एका वडापावसाठी २० ते ३५ रुपये मोजावे लागणार आहेत.



व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरवाढीमुळे हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच खाद्यतेल, बटाटा आणि पावाच्या दरातही वाढ झाल्याने वडापावच्या किमतीत ५ ते ७ रुपयांची वाढ करण्यात येत आहे. मुंबई, ठाणे आणि इतर शहरांमध्ये वडापावचे दर २५ रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. इडली आणि डोशासारख्या पदार्थांचे दरही ४० रुपयांच्या वर गेले आहेत. मुंबईतील प्रसिद्ध जिलेबी-फाफडा विक्रेत्यांनीही किमती वाढवल्या असून, आधी जिलेबी-फाफडा ५०० रुपये किलो » पान २ वर

## देवस्थान इनाम कायदा मंदिरांच्या अस्तित्वावरच घाला घालणारा आहे

### मंदिर महासंघाच्या सुनील घनवटांचा आरोप



**महाराष्ट्र सरकारच्या महसूल विभागाकडून देवस्थान इनाम जमिनी आणि मंदिरांच्या अन्य जमिनी कुळांच्या किंवा वहिवाटदारांच्या नावावर करण्यासाठी महाराष्ट्र देवस्थान इनाम हक्क निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६ हा मसुदा आणण्याची तयारी सुरू आहे. या प्रस्तावाला महाराष्ट्र मंदिर महासंघासह अनेक देवस्थान संस्थांनी तीव्र विरोध केला आहे. हा कायदा हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वावर घाला घालणारा असल्याचा आरोप महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी 'नवाकाळ'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत केला.**

**प्रश्न - महाराष्ट्र देवस्थान इनाम हक्क निर्मूलन हा प्रस्तावित कायदा नेमका काय आहे?**

**सुनील घनवट** - महाराष्ट्रातील अनेक मंदिरे, मठ आणि देवस्थानांना पूर्वी राजे, संस्थानिक किंवा सरकारकडून शेतीच्या जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या होत्या. या जमिनींच्या उत्पन्नावर मंदिरांचा दैनंदिन कारभार, पूजा-अर्चा, उत्सव, धर्मादाय कामे आणि कर्मचाऱ्यांचा खर्च चालतो. राज्य शासन आता महाराष्ट्र देवस्थान

**राजश्री दहिफळे**

इनाम हक्क निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६ आणण्याच्या तयारीत आहे. या मसुद्यानुसार अनेक वर्षांपासून देवस्थानांच्या जमिनी कसणाऱ्या कुळांना, भाडेकरूंना किंवा वहिवाटदारांना त्या जमिनी मालकी हक्काने देण्याचा प्रस्ताव आहे. या जमिनी मंदिरांच्या मालकीच्या आहेत. त्या विकता येत नाहीत, हस्तांतरित करता येत नाहीत किंवा खासगी नावावर करता येत नाहीत. या जमिनींवरून मिळणाऱ्या » पान २ वर

## परकीय चलन गंगाजळीत ८.०९ अब्ज डॉलरची घट

■ मुंबई

**मध्य पूर्वेतील** युद्धामुळे वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींचा फटका देशाच्या परकीय चलन गंगाजळीला बसला आहे. १५ मे २०२६ रोजी संपलेल्या आठवड्यात भारताची परकीय चलन गंगाजळी ८.०९ अब्ज डॉलरने कमी होऊन ६८८.८९४ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. त्याआधीच्या ८ मे रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय गंगाजळी ६.२९५ अब्ज डॉलरनी वाढून ६९६.९८८ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली होती. तर २७ फेब्रुवारी रोजी संपलेल्या आठवड्यात गंगाजळी ७२८.४९४ अब्ज डॉलर या सार्वकालिक उच्चांकावर होती. रुपयावर दबाव आल्यामुळे परकीय चलन बाजारात हस्तक्षेप करत डॉलरची विक्री करून बाजारातील तरलता वाढवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेला घ्यावा लागला.

नवा काळ
विजय

# 'नीट' माफियांचे आव्हान

**केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट प्रवेश परीक्षेच्या रचनेत महत्त्वाच्या बदलाची घोषणा केली आहे. त्यानुसार २०२७ च्या शैक्षणिक सत्रापासून ही परीक्षा कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट पद्धतीने घेतली जाणार आहे. देशपातळीवर अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या आणि लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य ठरवणाऱ्या या परीक्षेत वारंवार होणारे पेपरफुटीचे गैरप्रकार आणि परीक्षा माफियांचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी केंद्र सरकारने हा अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे. यंदाच्या पेपरलीक प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत पोहोचावेत आणि केंद्रस्थान विद्येचे माहेरघर असणारे पुणे असावे, ही बाब दुर्दैवी आहे. पण समोर येणाऱ्या बातम्यांमधून 'नीट'मधील यशवंतांचे शिल्पकार आपल्याच डोळ्यांत किती किलो धूळ फेकत होते, हे समाजाच्या लक्षात आले आहे.**




>>> रविवार विशेष



डॉ. जयदेवी पवार

मे २०२६ मध्ये नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे (एनटीए) आयोजित करण्यात आलेल्या 'नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट' (नीट-युजी) या देशातील अत्यंत महत्त्वाच्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेस २० लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी बसले होते. मात्र, परीक्षा संपताच काही दिवसांतच या परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचे वृत्त समोर आल्यामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आणि परीक्षा पद्धतीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. प्राथमिक तपासानुसार, परीक्षेपूर्वी एक 'अंदाज प्रश्नपत्रिका' (गेस पेपर) समाजमाध्यमांवर फिरत होती. या प्रश्नपत्रिकेत मोठ्या प्रमाणात प्रश्नांचा संच होता आणि त्यातील तब्बल १२० प्रश्न हे मूळ प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांशी तंतोतंत जुळणारे होते. या गंभीर बाबीची दखल घेत एनटीएने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आणि विद्यार्थ्यांकडून कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता नव्याने परीक्षा घेण्याची घोषणा केली आहे.

## महाराष्ट्र कनेक्शन

यंदाच्या परीक्षा प्रक्रियेला ज्या गैरव्यवहाराची वाळवी लागली, त्याचे सर्वात धक्कादायक आणि मुख्य केंद्र म्हणून महाराष्ट्राचे नाव समोर यावे ही खेदाची बाब आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) केलेल्या तपासातून, मूळचे मराठवाड्याचे शैक्षणिक केंद्र असलेले लातूर आणि विद्येचे माहेरघर मानले जाणारे पुणे या दोन शहरांमधील अत्यंत संघटित आणि विदारक जाळे उघड झाले आहे. देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याचा काही मर्यादित लोकांच्या आर्थिक हव्यासापोटी कसा बाजार मांडला गेला, याबाबत रोज नव्याने माहिती समोर येत आहे. या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर आणि धक्कादायक बाब म्हणजे, ज्या यंत्रणेवर देशातील सर्वोच्च परीक्षेची गोपनीयता राखण्याची जबाबदारी होती, त्याच यंत्रणेतील अंतर्गत घटकांचा वापर करून हे रॅकेट चालवले जात होते. सीबीआयने या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार म्हणून लातूरचे मूळ रहिवासी आणि सध्या पुण्यात कार्यरत असलेले सेवानिवृत्त रसायनशास्त्र प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना अटक केली आहे. प्रा. कुलकर्णी हे राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या आणि मराठी भाषांतराच्या पॅनेलवर दीर्घकाळापासून कार्यरत होते. आपल्या या अधिकृत पदाचा आणि गोपनीय माहितीच्या प्रवेशाचा गैरवापर करून त्यांनी परीक्षेच्या आधीच प्रश्नपत्रिका आणि त्यांची अचूक उत्तरे मिळवली. त्यांच्यासोबत पुण्याच्याच एका नामांकित कनिष्ठ महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र (बॉटनी) विषयाच्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांचाही सहभाग उघड झाला असून, त्यांनाही अटक करण्यात आली आहे. त्यादेखील एनटीएच्या पेपर सेटिंग पॅनेलमध्ये होत्या आणि त्यांच्याकडे जीवशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रश्नांची संपूर्ण माहिती होती. त्यामुळे हा घोटाळा केवळ बाहेरील घटकांनी केलेला नसून, परीक्षा यंत्रणेच्या मुख्य गाभ्यालाच पडलेले मोठे खिंडार आहे, हे स्पष्ट होते.

## मोटेगावकरांचे कारनामे

प्राध्यापकांनी मिळवलेली ही अतिसंवेदनशील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल करण्यासाठी व्यावसायिक कोचिंग क्लासेसच्या जाळ्याचा वापर करण्यात आला. सीबीआयने या प्रकरणी लातूरमधील 'आरसीसी' या अत्यंत बलाढ्य आणि प्रसिद्ध कोचिंग इन्स्टिट्यूटचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना अटक केली आहे. मोटेगावकर हे महाराष्ट्रातील वैद्यकीय प्रवेशाच्या कोचिंग क्षेत्रातील एक मोठे नाव होते. तपासादरम्यान मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये परीक्षेच्या तब्बल १० दिवस आधी म्हणजेच २३ एप्रिल रोजीच 'नीट' परीक्षेची रसायनशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका आणि उत्तरे पीएफडी स्वरूपात आढळून आली.

## मोडस ऑपरेंडी

या टोळीची मोडस ऑपरेंडी अत्यंत पद्धतशीर होती. परीक्षा घेण्यापूर्वी काही दिवस आधी निवडक आणि लाखो रुपये मोजण्यास तयार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शक वर्ग किंवा मॉक टेस्टचे आयोजन केले जात असे. या वर्गांमध्ये प्रा. कुलकर्णी आणि मांढरे हे विद्यार्थ्यांना थेट फायनल परीक्षेत येणारे प्रश्न आणि त्यांचे पर्याय लिहून देत असत. विद्यार्थ्यांनी आपल्या वहीत लिहून घेतलेले हे प्रश्न ३ मे रोजी झालेल्या प्रत्यक्ष परीक्षेशी तंतोतंत जुळत असल्याचे सीबीआयला आढळून आले आहे. अधिकृत तपासात असेही समोर आले आहे की, मोटेगावकर यांनी आपल्या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना जे प्रश्न संभाव्य म्हणून दिले होते, तेच परीक्षेत आल्याचा दावा करणारा एक व्हिडिओही समाजमाध्यमांवर प्रसारित झाला होता, जो आता त्यांच्याविरुद्ध मोठा पुरावा ठरला आहे.

## परराज्यांमध्ये विस्तार

हा घोटाळा केवळ लातूर आणि पुण्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्याचे धागेदोरे महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये आणि परराज्यांतही पसरले होते. पुण्यात ब्युटीपार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारे नावाच्या महिलेचा वापर श्रीमंत पालकांना आणि विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी केला जात होता. वाघमारे यांनी गोळा केलेले पैसे आणि विद्यार्थ्यांची माहिती अहिल्यानगरचे धनंजय लोखंडे यांच्याकडे सोपवली जात असे. लोखंडे यांनी ही माहिती नाशिक येथील बीएएमएसचा विद्यार्थी शुभम खैरनार याला दिली. खैरनार याने या प्रश्नपत्रिकेसाठी १० लाख रुपये मोजल्याचे कबूल केले असून, त्याने हीच प्रश्नपत्रिका टेलिग्रामच्या माध्यमातून हरियाणाच्या गुरुग्राममधील यश यादव नावाच्या व्यक्तीला १५ लाख रुपयांना विकली. यावरून हे स्पष्ट होते की, राजस्थानच्या सीकर आणि चुरू जिल्ह्यापासून सुरू झालेली ही साखळी हरियाणा, दिल्ली मार्गे थेट महाराष्ट्रातील लातूर, पुणे, नाशिक आणि अहिल्यानगरपर्यंत अत्यंत घट्टपणे जोडलेली होती.

## लातूर पॅटर्नला धक्का

या संपूर्ण आंतरराज्यीय रॅकेटमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५ ते १५ लाख रुपयांपर्यंतची रक्कम उकळण्यात आल्याचा संशय आहे. सीबीआयने मोटेगावकर आणि इतर आरोपींच्या पाच वेगवेगळ्या ठिकाणांवर छापे टाकून अनेक लॅपटॉप, मोबाईल फोन आणि संशयास्पद कागदपत्रे जप्त केली आहेत. आरोपींनी परीक्षा संपल्यानंतर हाताने लिहिलेले प्रश्न संच आणि इतर डिजिटल पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु फॉरेन्सिक तपासणी आणि मोबाईलमधील डेटा रिकव्हरीमुळे त्यांचे हे कारस्थान अपयशी ठरले.

महाराष्ट्रातील लातूर पॅटर्नने राज्याला शैक्षणिक क्षेत्रात एक मोठी ओळख मिळवून दिली होती. परंतु, याच लातूरमधील अग्रगण्य क्लासेसचे संचालक आणि पुण्याचे नामांकित प्राध्यापक या घोटाळ्यात मुख्य आरोपी म्हणून समोर आल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रतिमेला मोठा तडा गेला आहे. लाखो विद्यार्थी दीर्घकाळ दिवसातील १२-१२ तास अभ्यास करून या परीक्षेची तयारी करतात. त्यांच्या पालकांची आयुष्यभराची कमाई मुलांच्या शिक्षणासाठी पणाला लागलेली असते. अशावेळी पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका आधीच मिळवून गुणवत्ता यादीत अव्वल स्थान पटकावणाऱ्या प्रवृत्तींमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे प्रचंड मानसिक आणि शैक्षणिक नुकसान झाले आहे. या मोठ्या घोटाळ्यामुळे राष्ट्रीय स्तरावर प्रचंड जनक्षोभ उसळल्यानंतर सरकारने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला.

सीबीआयने आतापर्यंत या प्रकरणात १० हून अधिक मुख्य आरोपींना अटक केली असून, ६० हून अधिक संशयित लाभार्थी विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या पालकांची चौकशी सुरू केली आहे. गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जात असली, तरी या निमित्ताने संपूर्ण परीक्षा पद्धती, खासगी कोचिंग क्लासेसचे वाढते प्रस्थ आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांची सुरक्षा यंत्रणा यावर आमूलाग्र पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत अशा गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी अत्यंत कठोर कायदे आणि पारदर्शक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही, तोपर्यंत देशातील शिक्षण व्यवस्थेची ढासळलेली विश्वासार्हता पुन्हा मिळवणे कठीण आहे.

पेपरफुटी ही 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा, २०२४' च्या कलम ३ नुसार 'अनुचित साधन' (अनफेअर मीन्स) या श्रेणीत मोडते. ही साधी घोडचूक नसून, परीक्षा प्रक्रियेतील छपाई, वाहतूक किंवा साठवणूक यांसारख्या गुप्त टप्प्यांवर अधिकृत प्रवेश असलेल्या व्यक्तींच्या संगनमताने केलेला संघटित गुन्हा मानला जातो. नॅशनल टेस्टिंग एजन्सी ही शिक्षण मंत्रालयांतर्गत काम करणारी स्वायत्त संस्था आहे. परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणणे हे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. एनटीए प्रश्नपत्रिकांची सुरक्षा, बायोमेट्रिक पडताळणी आणि परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या कडक नियमावलीचा वापर करते. परंतु, देशातील अवाढव्य विद्यार्थी संख्या पाहता एनटीएला छपाई, सुरक्षा आणि वाहतुकीसाठी बाह्य संस्थांवर अवलंबून राहावे लागते. याच विकेंद्रीकरणामुळे सुरक्षेमध्ये त्रुटी निर्माण होतात आणि उत्तरदायित्व निश्चित करणे कठीण होते.

'नीट' पेपरफुटी प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा कशी होईल, याबाबत सीबीआयने सर्व कसब पणाला लावण्याची गरज आहे; पण केवळ कठोर शिक्षेची तरतूद पुरेशी नाही. २०१५ ते २०२६ या कालावधीत आपल्या देशात तब्बल १४८ परीक्षांचे घोटाळे झाले आहेत. ८७ पेक्षा जास्त परीक्षा रद्द कराव्या लागल्या आहेत आणि जवळपास नऊ कोटी विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागल्याचे समोर आले आहे. केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच नीटचा पेपरही परीक्षेच्या ४८ तास आधी डार्क वेबवर विकला जातो आणि नंतर तो टेलिग्रामवर अगदी कवडीमोलाने लिलावात येतो. कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षांचे कंत्राट ज्या खासगी कंपन्यांना दिले जाते, त्यांच्याच कर्मचाऱ्यांनी यंत्रणेचा ताबा घेऊन पेपर बाहेर काढल्याची उदाहरणे आहेत.

राधाकृष्णन समितीने प्रश्नपत्रिकांची जुनी व्यवस्था बदलण्याची आग्रही मागणी केली आहे. परीक्षा सुरू होण्याच्या अवघ्या ३० मिनिटे आधी प्रश्नपत्रिका डिजिटल स्वरूपात थेट केंद्रावर डाऊनलोड झाली पाहिजे आणि परीक्षा संगणकावर आधारित पद्धतीने घेतल्या पाहिजेत असे सुचवले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट प्रवेश परीक्षेच्या रचनेत महत्त्वाच्या बदलाची घोषणा केली आहे. त्यानुसार २०२७ च्या शैक्षणिक सत्रापासून ही परीक्षा कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट पद्धतीने घेतली जाणार आहे. त्यावेळी नव्याने काही गैरप्रकार समोर येऊ नयेत, हीच प्रांजळ अपेक्षा!

# बोलबाला झुरळ पार्टीचा




**भारताच्या राजकीय पटलावर आजवर अनेक पक्ष आले आणि गेले. परंतु देशाच्या लोकशाहीच्या इतिहासात डिजिटल युगाने एका अशा विलक्षण आणि अभूतपूर्व प्रयोगाला जन्म दिला आहे... या प्रयोगाची कोणी कल्पनाही केली नव्हती. सोशल मीडियाच्या महाजालात सध्या 'कॉक्रोच जनता पार्टी' अर्थात 'सीजेपी' या नावाचे एक नवीन वादळ घोंगावत आहे. सुरुवातीला निव्वळ एक डिजिटल विनोद किंवा उपरोधिक टीका म्हणून सुरू झालेल्या या मोहिमेने अवघ्या काही दिवसांत लाखो तरुणांना आपल्याकडे आकर्षित करून एका मोठ्या राजकीय-सांस्कृतिक आंदोलनाचे रूप धारण केले आहे. ही केवळ एका नावापुरती मर्यादित संकल्पना नसून, देशातील सुशिक्षित आणि बेरोजगार तरुण पिढीच्या मनात साचलेल्या तीव्र संतापाचे आणि उद्वेगाचे ते प्रतीक बनले आहे.**



पोपट नाईकनवरे,
राज्यशास्त्र अभ्यासक

या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे न्यायव्यवस्थेतील एका वरिष्ठ स्तरावरून आलेल्या वादग्रस्त विधानाशी जोडलेली आहेत. सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान कथितपणे बेरोजगार तरुणांची तुलना 'कॉक्रोच' म्हणजेच झुरळांशी करण्यात आली. त्यावरून समाजमाध्यमांवर प्रचंड संतापाची लाट उसळली. व्यवस्थेकडून मिळणाऱ्या या अपमानास्पद वागणुकीला आणि उपहासाला तरुणांनी अत्यंत हुशारीने आणि शांततापूर्ण मार्गाने उत्तर देण्याचे ठरवले. अपमान नाकारण्याऐवजी त्यांनी त्याच अपमानाला आपले शस्त्र बनवले. आम्ही जर झुरळ आहोत, तर मग ही झुरळांचीच संघटना आहे, असे म्हणत अभिजित दिपके या तरुणाने सोशल मीडियावर गुगल फॉर्म जारी केला आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'ची स्थापना केली. हा उपरोध इतका तीव्र होता की, अवघ्या तीन ते पाच दिवसांत या काल्पनिक पक्षाच्या सदस्यत्वाची नोंदणी एक लाखाच्या पार गेली आणि इंस्टाग्रामवर तर याचे लाखो फॉलोअर्स तयार झाले. या संख्येने प्रस्थापित राजकीय पक्षांनाही मागे टाकले. कॉक्रोच जनता पार्टीचा जाहीरनामा आणि अजेंडा हा जितका उपरोधिक आहे, तितकाच तो देशातील सद्य राजकीय आणि सामाजिक स्थितीवर नेमके बोट ठेवणारा आहे. स्वतःला 'धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाहीवादी आणि आळशी' म्हणवून घेणाऱ्या या पक्षाने प्रस्थापित व्यवस्थेतील त्रुटींवर अत्यंत गंभीर मागण्या मांडल्या आहेत. त्यांच्या पाच मुख्य मागण्यांमध्ये, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना निवृत्तीनंतर कोणत्याही प्रकारचे राज्यसभेचे पद किंवा इतर राजकीय बक्षीस देण्यावर पूर्ण बंदी घालण्याची मागणी समाविष्ट आहे, जी न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. याशिवाय, संसदेत आणि मंत्रिमंडळात महिलांना ५० टक्के आरक्षण देणे, पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर २० वर्षांची निवडणूक बंदी घालणे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या परीक्षा घोटाळ्यांवर कडक कारवाई करणे अशा मागण्यांचा यात समावेश आहे. हा अजेंडा वाचताना तो वरवर सामान्य वाटत असला, तरी त्यातील अंतर्गत सूर हा देशातील लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी अत्यंत गंभीर आहे.

या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे आंदोलन केवळ डिजिटल स्क्रीनपुरते मर्यादित राहिले नाही, तर ते रस्त्यावरही उतरले आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी झुरळांचे मुखवटे घालून आणि फलक हातात धरून यमुना नदीच्या पात्रात स्वच्छता मोहीम राबवली. समाज आपल्याला ज्या नावाने हिणवतो, त्याच नावाने सार्वजनिक सेवा करून तरुणांनी व्यवस्थेला चपराक लगावली आहे. प्रस्थापित राजकीय पक्षांना कोट्यवधी रुपयांचा निधी आणि अफाट संसाधने खर्च करूनही जी तरुण पिढी आपल्याकडे वळवता येत नाही, ती पिढी एका मीम आणि उपरोधाच्या बळावर या पक्षाशी जोडली गेली. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही या डिजिटल मोहिमेला पाठिंबा दर्शवल्याने या विषयाची व्याप्ती अधिकच वाढली आहे.

केवळ एक सोशल मीडिया ट्रेंड म्हणून याकडे पाहणे सोपे असले तरी उचित नाही. देशातील वाढती बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटीचे सत्र, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि संस्थांबद्दल तरुणांच्या मनात निर्माण झालेली अविश्वासार्हता या सर्व घटकांचा एकत्रित उद्रेक यातून झाला आहे. तरुण पिढीला त्यांचे प्रश्न संसदेत किंवा मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये गांभीर्याने मांडले जात नाहीत, असे वाटते तेव्हा ती आपले मत मांडण्यासाठी अशा प्रकारच्या 'पार्टिसिपेटरी सॅटायर' म्हणजेच सहभागात्मक उपहासाचा मार्ग निवडते. झुरळ हे जसे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिवंत राहणारे आणि संघर्ष करणारे जीव म्हणून ओळखले जाते. तशाच प्रकारे देशातील तरुण स्वतःला या व्यवस्थेत टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करत आहेत, हाच या नावामागचा खरा संदेश आहे.

कॉक्रोच जनता पार्टी भविष्यात प्रत्यक्ष राजकारणात उतरेल की नाही, हा प्रश्न दुय्यम आहे. परंतु, त्यांनी प्रस्थापित राजकीय पक्षांना आणि देशातील सर्वोच्च संस्थांना एक मोठा इशारा नक्कीच दिला आहे. देशातील तरुणाईला केवळ 'डिजिटल आणि आळशी' म्हणून हिणवून चालणार नाही, तर त्यांच्या रोजगाराच्या आणि भविष्याच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागेल. इंटरनेट संस्कृती आणि मीम्स आता केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नसून, ते राजकीय क्रांतीचे आणि विरोधाचे एक नवे माध्यम बनले आहे, हे या मोहिमेने सिद्ध केले आहे. या निमित्ताने का होईना, तरुणांच्या मनातील खदखद समोर आली आहे आणि ती वेळीच ओळखून व्यवस्थेने आपल्यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

# वाचवूया वनौषधी

**हजारो वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या आयुर्वेद शास्त्राचा पाया हा निसर्गाशी असलेल्या सुसंवादावर उभा होता. पर्वत, वन, नद्या, झरे, माती, हवामान आणि स्थानिक जैवविविधता यांच्या परस्पर संबंधांतून औषधी गुणांनी युक्त वनस्पती निर्माण होत असत. विशेषतः हिमालयीन प्रदेश हा दुर्मीळ औषधी वनस्पतींचा खजिना मानला जात असे. त्याकाळी निसर्गावर मानवी हस्तक्षेप अत्यल्प होता. त्यामुळे वनस्पतींच्या मूळ गुणधर्मांचे जतन होत होते आणि त्यातून तयार होणाऱ्या आयुर्वेदिक औषधांची परिणामकारकताही टिकून राहत होती. मात्र आधुनिक काळातील बदलत्या पर्यावरणीय आणि आर्थिक व्यवस्थेमुळे ही संपूर्ण साखळी धोक्यात आली आहे.**





अनिल प्रकाश जोशी,
ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ

आज जंगलांचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. नद्या आटत आहेत, हवामान बदलत आहे, तापमान वाढत आहे आणि मातीची गुणवत्ता खालावत चालली आहे. या सर्वांचा सर्वाधिक परिणाम जर कोणावर झाला असेल, तर तो औषधी वनस्पतींवर झाला आहे. कारण प्रत्येक वनस्पतीची वाढ ही विशिष्ट भौगोलिक आणि पर्यावरणीय परिस्थितीवर अवलंबून असते. एखाद्या वनस्पतीला आवश्यक असलेली आर्द्रता, सावली, उंची, तापमान आणि मातीतील सूक्ष्म घटक बदलले, तर तिच्या औषधी गुणधर्मांमध्येही बदल होतो. त्यामुळे केवळ वनस्पतीचे नाव किंवा तिची बाह्य रचना जपून उपयोग होत नाही. तिच्या अंतर्गत औषधी सामर्थ्याचे जतन होणे अधिक महत्त्वाचे असते.

आयुर्वेदातील बहुतेक औषधे ही विविध वनस्पतींच्या मिश्रणातून तयार होतात. त्रिफळा, अश्वगंधा, च्यवनप्राश किंवा इतर अनेक पारंपरिक औषधांचे उदाहरण घेतले, तरी त्यामध्ये अनेक दुर्मीळ वनस्पतींचा समावेश असतो. परंतु आज या वनस्पतींपैकी अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्या आहेत. काही वनस्पती तर प्रत्यक्षात जंगलांतून जवळपास नाहीशा झाल्या आहेत. परिणामी, बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक आयुर्वेदिक उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. उत्पादनांची नावे पारंपरिक असली, तरी त्यामागील मूळ औषधी सामर्थ्य कमी होत चालले आहे. ही स्थिती आयुर्वेदासाठी गंभीर इशारा मानावी लागेल. या संकटामागे व्यापारीकरण हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. पूर्वी आयुर्वेद ही घराघरांतली जीवनपद्धती होती. स्थानिक ज्ञान, अनुभव आणि निसर्गाशी असलेले निकट नाते यामधून ती विकसित झाली होती. मात्र कालांतराने औषधी वनस्पती या मोठ्या बाजारपेठेचा भाग बनल्या. जंगलांतून मोठ्या प्रमाणावर वनस्पती गोळा करून त्यांचा व्यावसायिक वापर सुरू झाला. मागणी वाढत गेली, तसा अति-दोहनही वाढला. अनेक कंपन्यांनी उत्पादन वाढविण्यासाठी पर्याय शोधले. परंतु त्यातून औषधांच्या मूळ गुणवत्तेवर परिणाम झाला. वनस्पतींच्या संख्येपेक्षा त्यांच्या गुणधर्मांचे जतन अधिक महत्त्वाचे असते, ही बाब दुर्लक्षित झाली.

औषधी वनस्पतींची शेती हा एक पर्याय पुढे आला असला, तरी तो सर्वार्थाने समाधानकारक नाही. कारण एखादी वनस्पती नैसर्गिक अधिवासात ज्या गुणांनी विकसित होते, तेच गुण कृत्रिम किंवा वेगळ्या वातावरणात तितक्याच प्रभावीपणे टिकतीलच असे नाही. विज्ञानाच्या भाषेत ज्यांना 'सक्रिय घटक' म्हटले जाते. ते घटक स्थानिक हवामान, माती आणि परिसंस्थेशी घट्ट जोडलेले असतात. त्यामुळे केवळ व्यापारी शेती करून आयुर्वेदिक वनस्पतींची खरी गुणवत्ता जपता येणार नाही. त्यासाठी त्या वनस्पतींच्या मूळ अधिवासांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. आज जगभरात आयुर्वेदाविषयी नव्याने आकर्षण निर्माण होत आहे. आधुनिक औषध पद्धतींच्या मर्यादा आणि दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर अनेक लोक नैसर्गिक उपचारांकडे वळताना दिसतात. भारतीय आयुर्वेदिक उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. ही स्थिती भारतासाठी आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाची आहे. मात्र जर औषधी वनस्पतींची गुणवत्ता सातत्याने खालावत गेली, तर आयुर्वेदाची विश्वासार्हताच धोक्यात येऊ शकते. त्यामुळे हा विषय केवळ पर्यावरणीय किंवा सांस्कृतिक नसून आर्थिक आणि आरोग्यविषयकही आहे.

यासाठी आता व्यापक आणि दीर्घकालीन धोरणाची आवश्यकता आहे. औषधी वनस्पतींच्या नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, स्थानिक समुदायांचा सहभाग, वैज्ञानिक संशोधन आणि नियंत्रित वापर या सर्व बाबी एकत्रितपणे राबवाव्या लागतील. हिमालयासारख्या संवेदनशील प्रदेशांतील जैवविविधतेचे जतन करणे ही राष्ट्रीय प्राधान्याची बाब बनली पाहिजे. त्याचबरोबर पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण आणि स्थानिक वैद्यकीय परंपरांचे पुनरुज्जीवनही आवश्यक आहे.

औषधी वनस्पतींकडे केवळ बाजारातील उत्पादनाच्या परिप्रेक्ष्यातून पाहून चालणार नाही. त्या भारतीय संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या ज्ञानपरंपरेच्या प्रतीक आहेत. त्यांच्यामध्ये निसर्ग, विज्ञान आणि मानवी अनुभव यांचा समन्वय दडलेला आहे. म्हणूनच या वनस्पतींचे संवर्धन म्हणजे केवळ काही प्रजाती वाचविणे नसून भारतीय जीवनदृष्टीचे जतन करणे होय. निसर्गाशी असलेले हे नाते जर आपण टिकवू शकलो नाही, तर भविष्यात आयुर्वेदाची ओळख फक्त नावापुरती उरेल. त्यामुळे औषधी वनस्पतींचे संरक्षण ही आजच्या काळातील अत्यंत गंभीर आणि अपरिहार्य जबाबदारी मानावी लागेल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# उन्हाचा कडाका, महागाईचाही तडाखा

उन्हाचा वाढता कडाका आणि त्यात इंधन टंचाई आणि दरवाढीचा तडाखा अशा कात्रीमध्ये सर्वसामान्य माणूस सापडला आहे. गेल्या दहा दिवसांत चौथ्यांदा इंधन दरवाढ झाली. दोन दिवसांपूर्वीच पेट्रोल डिझेलच्या दरात साठ ते पासष्ट पैशांनी वाढ केली होती आणि आता पुन्हा पेट्रोल-डिझेलचे दर सरासरी ९५ पैसे प्रतीलीटरने वाढलेले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती भडकत असल्याने त्याचा भारतीय तेलखरेदीवरही परिणाम होतो आहे. या वाढत्या किमतीला तोंड देण्यासाठी काही प्रमाणात दरवाढ करण्याशिवाय केंद्र सरकारपुढे पर्याय राहिलेला नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या भारतासारख्या देशाला सर्वाधिक इंधन साठा लागत असतो आणि त्याचा पुरवठा खंडीत होऊ नये. म्हणजेच कोणत्याही मोठ्या टंचाईला तोंड देण्याची वेळ येऊ नये या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय बाजारात ज्यादा किंमत देऊन इंधन खरेदी करावे लागते आहे. ज्याप्रमाणात जागतिक स्तरावर इंधन दरामध्ये वाढ होते आहे त्या पद्धतीची दरवाढ देशांतर्गत इंधन विक्रीबाबत करता येत नाही. जगाच्या तुलनेमध्ये भारताची इंधन दरवाढ ही खूपच मर्यादित असल्याचे सांगितले जात आहे. प्रश्न एवढाच निर्माण होतो आहे की एकीकडे दरवाढ तर दुसरीकडे इंधन टंचाई हा विरोधाभास कोणत्या कारणांमुळे होतात. त्याचाच खुलासा सरकारने केला पाहिजे. गेल्या आठवडाभर महाराष्ट्रातल्या जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये इंधन तुटवडा शिगेला पोहचला आहे. सरकारने वारंवार इंधन साठा पुरेसा आहे असे सांगूनही ही परिस्थिती निर्माण होताना दिसून येते. काही दिवसांपूर्वी याच स्तंभामध्ये आम्ही इंधन तुटवड्याचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता अनेकदा व्यक्ती केली गेली होती. साठेबाजी करून इंधनाचा काळाबाजार करण्याचे प्रकारही अनेक ठिकाणी होऊ लागले आहेत. दिवसेंदिवस बदलत जाणारी ही परिस्थिती दिलासा देण्याऐवजी गंभीर होत जाते आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. परंतु परिस्थितीच हाताबाहेर जात असेल तर जिल्हाधिकारी हतबलच होतील यात काही शंका नाही.

**संभ्रम आणि महागाईला आमंत्रण**

आजच्या या नव्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांना फटका तर बसेलच परंतु आधीच वाढत असलेल्या महागाईत हे नवे तेल ओतले गेले आहे. स्वाभाविकपणे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढायला सुरूवात झालेली आहे. मुंबईत मोठ्या हॉटेल्समधून वडापावपासून ते पावभाजीपर्यंतचे दर दोन ते तीन रुपयांनी वाढले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी आपला पाच दिवसांचा दौरा संपल्यानंतर तातडीने बराच काळ मंत्रिमंडळाची बैठक घेतली होती. ज्यामध्ये येणाऱ्या परिस्थितीचीच जाणीव करून देत असताना अधिकाधिक नवनवीन उपाययोजना करण्यामध्ये भर दिला होता. तातडीने ही बैठक बोलवण्याची आणि त्यातील सद्य परिस्थितीवर पंतप्रधानांनी केलेले भाष्य या सर्वांचा मतितार्थ असा आहे की, पुढच्या पंधरा-वीस दिवसांत पुन्हा इंधन दरवाढ होऊ शकते. पंतप्रधानांनी परदेशी प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहेच. शिवाय विमान प्रवासालाही कात्री लावण्याचे आवाहन केले होते. यामागचा उद्देश हाच होता की, सामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या इंधनाचा पुरवठा सुरळीतपणे होत राहावा. हवाई प्रवासासाठी बऱ्याच प्रमाणात इंधन लागते आणि हवाई प्रवास करणारा वर्ग बऱ्यापैकी धनिक वर्ग असतो. त्यातल्या अनावश्यक प्रवासाला कात्री लागली तर काही प्रमाणात इंधन बचत होऊ शकेल. अर्थात पंतप्रधानांच्या या आवाहनाला अजूनही अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. एकाचवेळी विविध स्तरावर अधिकाधिक प्रमाणात उपाययोजनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारचे हे प्रयत्न आणि एकूण जनमानसामध्ये निर्माण झालेली भावना यामध्ये मोठी तफावत आहे. राज्य असो किंवा केंद्र सरकार असो. यांच्यातर्फे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत जनतेला विश्वासात घेण्याची आवश्यकता आहे. जर परिस्थिती नियंत्रणाखाली असेल आणि खूप मोठ्या टंचाईची कोणतीही शक्यता नसेल तर सरकारने ही बाब जनसामान्यांपर्यंत नीट पोहचवण्याची आवश्यकता आहे. ती पोहचवली जात नसल्याने संभ्रम निर्माण होतो आहे.

**रोज सातशे ते चौदाशे कोटींचा तोटा**


ही गोष्ट खरीच आहे की, सरकारी तेल कंपन्यांवर बदलत्या परिस्थितीचा बऱ्यापैकी भार पडतो आहे. सध्या तेल कंपन्यांना ७५० कोटी रुपये रोज तर अन्य काही काळामध्ये जवळपास चौदाशे कोटींपर्यंत रोजचा तोटा सहन करावा लागत आहे. हा भार प्रदीर्घ काळ कंपन्या सहन करू शकत नाहीत. त्यासाठीच सरकारला आपला तेलसाठा अधिकाधिक सुरक्षित करावा लागतो आहे. कारण या आर्थिक कारणामुळे इंधनाचे रिफायनिंग आणि त्याबरोबरच देशातील पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीवरही परिणाम होऊ लागलेला आहे. सध्या सरकारला हा सगळा तोटा नियंत्रणात ठेवण्याकरीता तेलाच्या दरात थोडीथोडी वाढ करणे गरजेचे झालेले आहे. सामूहिकपणे काही महत्त्वाच्या गोष्टींच्या वापरावर बंधने आली तर त्याचा सकारात्मक परिणाम होईल आणि मोठी दरवाढ करण्याची आवश्यकता उरणार नाही. तर तो एकूण परिस्थितीचा आवाका लक्षात घेतला तर या संपूर्ण देशामध्ये तापमान वेगाने वाढते आहे. तर दुसरीकडे इंधन टंचाईबरोबर ऊर्जेच्या मागणीतही मोठ्या प्रमाणावर वाढ नोंदली जाते आहे. प्रत्यक्ष युद्धकाळातच या सगळ्या परिस्थितीची सरकारला कल्पना आली होती. जागतिक स्तरावरची विस्कटलेली आर्थिक घडी आणि सर्वच देशांना भेडसावत असलेली इंधनटंचाई सुरळीत व्हायला पुढचे अजून सहा ते आठ महिने लागण्याची शक्यता आहे. सध्याचा हा काळ सरकारच्या कसोटीचा तर आहेच. परंतु जनतेच्याही सहनशीलतेचा अंत पाहाणारा ठरतो. सामान्य जनता आपापल्यापरीने शक्य तेवढी बचत करण्याचा प्रयत्न करेलच. परंतु अजूनही सरकारी पातळीवरच्या उधळपट्टीला लगाम बसलेला नाही, हीदेखील वस्तुस्थिती आहे.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

गेलेले दिवस परत येत नाहीत आणि येणारे दिवस कसे येणार आहेत हे सांगता येत नाही, म्हणूनच आयुष्य हसत जगा.

**पंचांग**



रविवार, २४ मे २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* अधिक ज्येष्ठ शुक्ल नवमी
* नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी

रवी उदय- ०६-०३
रवी अस्त- १९-०८

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० सिंह

जागतिक राष्ट्रकुल दिन

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
REGD. No. MAHMAR/2021/81075

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### म्हैसूरपाक

★ **साहित्य :** एक वाटी हरभरा डाळीचे पीठ, तीन वाट्या पातळ तूप, दोन वाट्या साखर, पाऊण वाटी पाणी.

★ **कृती :** चमचाभर तुपावर डाळीचे पीठ किंचित भाजा. नंतर साखरेत पाणी घालून साखर मंद आचेवर विरघळून घ्या. साखर विरघळल्यावर पीठ घालून मिसळा.

लगेचच वरुन गरम तुपाची धार धरत एका हाताने मिश्रण हलवा. नंतर कालथ्याने मिश्रण ढवळत राहा. तूप पिठात मिसळते, बुडबुडे येतात, जाळी दिसते. त्याच्या कडेने तूप सुटल्यावर, मिश्रणातून बाहेर यायला लागल्यावर (साधारण तूप घातल्यानंतर १०-११ मिनिटांनी) पातेले खाली उतरवून मिश्रण घोटून घ्या. आता मिश्रणाचा गोळा मधोमध तुपात दिसतो.

बाजूचे तूप काढून घेऊन मिश्रण थाळ्यात ओता. जरा थंड झाल्यावर त्याच्या वड्या पाडा. अशारितीने तुमचे म्हैसूरपाक तयार झाले आहे.

## क्रीडा

# कोलकाता-दिल्लीत चौथ्या स्थानासाठी लढाई

## सूर्यवंशीच्या वादळासमोर आज मुंबईचे आव्हान

■ मुंबई





**आयपीएल २०२६ स्पर्धा आता अत्यंत निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, प्लेऑफच्या शर्यतीमुळे प्रत्येक सामना अधिक रंगतदार झाला आहे. उद्या होणाऱ्या दोन महत्त्वाच्या सामन्यांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात धावांचा महासंग्राम रंगणार आहे. दुसरीकडे कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील सामना प्लेऑफच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. गुणतालिकेतील समीकरणे, नेट रनरेटचा दबाव आणि विजयाची गरज यामुळे दोन्ही सामने प्रचंड चुरशीचे होण्याची शक्यता आहे.**

**वानखेडे** स्टेडियमवर राजस्थान आणि मुंबई यांच्यात धावांचा पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राजस्थानचा १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असून, त्याने आपल्या स्फोटक फलंदाजीने संपूर्ण स्पर्धेत खळबळ उडवली आहे. गेल्या तीन डावांत त्याने २३० पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने १७५ धावा केल्या आहेत. लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध २०० पेक्षा अधिक धावांच्या पाठलागात त्याने अवघ्या ३८ चेंडूंमध्ये ९३ धावांची धडाकेबाज खेळी करत सर्वांचे लक्ष वेधले.

यशस्वी जयस्वाल, ध्रुव जुरेल आणि सूर्यवंशी यांच्या जोरावर राजस्थानची फलंदाजी अत्यंत मजबूत दिसत आहे. सुरुवातीपासून आक्रमक खेळ करून विरोधी गोलंदाजांवर दबाव निर्माण करणे ही राजस्थानची प्रमुख ताकद ठरली आहे. दुसरीकडे मुंबई इंडियन्ससाठी हा हंगाम निराशाजनक ठरला आहे. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या यांसारखे स्टार खेळाडू असूनही संघाला सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही. १३ सामन्यांत केवळ चार विजयांसह मुंबई नवव्या स्थानावर आहे. मुंबईकडून जसप्रीत बुमराह आणि दीपक चहर यांच्यावर राजस्थानच्या आक्रमक फलंदाजीला रोखण्याची मोठी जबाबदारी असेल. वानखेडेची खेळपट्टी फलंदाजांसाठी पोषक असल्याने पुन्हा एकदा मोठ्या धावसंख्येचा सामना पाहायला मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, नवी दिल्लीत होणारा केकेआर आणि दिल्ली कॅपिटल्समधील सामना प्लेऑफच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

दोन्ही संघांसाठी ही 'करा किंवा मरा' परिस्थिती असून, पराभव झाल्यास प्लेऑफचे स्वप्न जवळपास संपुष्टात येऊ शकते. केकेआरने हंगामाच्या उत्तरार्धात शानदार पुनरागमन केले आहे. त्यांनी शेवटच्या सातपैकी सहा सामने जिंकत स्पर्धेत दमदार पुनरागमन केले. दुसरीकडे दिल्लीची फलंदाजी मोठ्या प्रमाणावर के. एल. राहुल याच्यावर अवलंबून आहे. राहुलने १३ डावांत ५३३ धावा करत सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. डेव्हिड मिलरच्या पुनरागमनामुळे मधल्या फळीला बळ मिळाले असले, तरी गोलंदाजीत सातत्याचा अभाव दिल्लीसाठी चिंतेचा विषय ठरला आहे.

# महापौर चषकात अनिकेत-प्रसादची फटकेबाजी! वियोमचा शानदार विजय

■ मुंबई

**दादरच्या** शिवाजी पार्क परिसरातील पार्क क्लबवर सुरू झालेल्या 'मुंबई महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धेत' वियोम फाऊंडेशन इनडोअर क्रिकेट क्लबने दमदार कामगिरी करत मीडिया टीमवर ४० धावांनी शानदार विजय मिळवला. अनिकेत माडीये आणि प्रसाद आंब्रे यांच्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर वियोमने ८२ धावांचा भक्कम टप्पा गाठत स्पर्धेत विजयी सलामी दिली. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार सुनील शिंदे आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी पार्क क्लबच्या कार्याध्यक्षा वरदा चुरी, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

'महापौर चषक' इनडोअर क्रिकेट स्पर्धेत वियोम फाऊंडेशन इनडोअर क्रिकेट क्लबने दमदार खेळ करत मीडिया टीमवर ४० धावांनी शानदार विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मीडिया टीमला ४२ धावांपर्यंतच मजल मारता आली. वियोमकडून रोहन, ओमकार, कुश आणि प्रसाद यांनी अचूक गोलंदाजी करत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव कायम ठेवला. लक्ष्याचा पाठलाग करताना अनिकेत माडीये आणि प्रसाद आंब्रे यांनी आक्रमक फलंदाजी करत सामन्याचे चित्र बदलले, तर कर्णधार ओमकार पाटोळे आणि शुभम गुरव यांनी शेवटपर्यंत संयमी खेळी करत संघाला ८२ धावांपर्यंत नेले.

# भारतात फिफा विश्वचषक प्रसारणाचा मार्ग मोकळा

■ नवी दिल्ली


**भारतीय** फुटबॉल चाहत्यांना फिफा विश्वचषक २०२६ चे सामने भारतात थेट पाहण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. प्रसारण हक्कांबाबत डील अंतिम टप्प्यात आहे. पुढील आठवड्यात याबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

भारतातील प्रसारण हक्कांसाठी सुमारे ३० ते ३५ दशलक्ष अमेरिकन डॉलर म्हणजेच जवळपास २८० ते ३३५ कोटी रुपयांचा करार निश्चित करण्यात आला आहे. भारतातील वाढती फुटबॉल लोकप्रियता आणि प्रचंड प्रेक्षकसंख्या लक्षात घेता हा व्यवहार फिफासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# सुपर चेस क्लासिकमध्ये १३९ चालींचा मॅरेथॉन सामना

■ बुखारेस्ट

**बुखारेस्ट** येथे सुरू असलेल्या सुपर चेस क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद आणि फ्रान्सचा ग्रँडमास्टर लाग्रेव्ह यांच्यात तब्बल १३९ चाली आणि ६ तासांहून अधिक काळ मॅरेथॉन सामना रंगला. अत्यंत चुरशीच्या या लढतीत दोन्ही खेळाडूंनी दमदार खेळ करत अखेर सामना ड्रॉमध्ये सोडवला.



प्रज्ञानंद-लाग्रेव्ह ड्रॉ

मिडल गेममध्ये प्रज्ञानंदला काही क्षणांसाठी निर्णायक फायदा मिळण्याची संधी होती. त्याने प्रतिस्पर्ध्याच्या चुकीचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र लाग्रेव्हने अत्यंत संयमी आणि अचूक बचाव करत स्थिती सावरली. सुमारे मध्य टप्प्यानंतर सामना अधिकच गुंतागुंतीचा झाला. दोन्ही खेळाडूंनी वेळेच्या दबावाखालीही अचूक चाली करत खेळ पुढे नेला. एंडगेममध्ये दोन्ही बाजूंनी विजयासाठी जोरदार प्रयत्न झाले, पण कुणालाही निर्णायक आघाडी मिळू शकली नाही. अखेरीस १३९ व्या चालीवर दोन्ही खेळाडूंनी ड्रॉ मान्य करत सामना संपवला. या मॅरेथॉन लढतीमुळे प्रेक्षकांना अत्यंत रोमांचक आणि उच्च दर्जाचा सामना पाहायला मिळाला. या निकालानंतर सुपर चेस क्लासिकमधील विजेतेपदाची शर्यत अधिकच तीव्र झाली असून, आता काहीच खेळाडू किताबासाठी प्रबळ दावेदार राहिले आहेत. अंतिम फेरीपूर्वी प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# भांब्री-व्हीनसची शानदार कामगिरी जिनिव्हा ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश

■ जिनिव्हा

**भारताचा** युकी भांब्री आणि त्याचा न्यूझीलंडचा जोडीदार मायकल व्हीनस यांनी शानदार खेळ करत जिनिव्हा ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटाची अंतिम फेरी गाठली आहे. उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित या जोडीने चेक प्रजासत्ताकच्या पेट्र रिक्ल आणि डम पावलासेक यांचा सरळ सेट्समध्ये ७-५, ६-३ असा पराभव केला.

भांब्री आणि व्हीनस यांनी संपूर्ण सामन्यात आक्रमक आणि संयमी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. पहिल्या सेटमध्ये दोन्ही जोड्यांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र निर्णायक क्षणी भारतीय-न्यूझीलंड जोडीने अचूक सर्व्हिस आणि नेटजवळील प्रभावी खेळाच्या जोरावर सेट आपल्या नावावर केला. दुसऱ्या सेटमध्ये भांब्री-व्हीनस जोडीने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. सातत्यपूर्ण सर्व्हिस आणि प्रतिस्पर्ध्यांवर टाकलेला दबाव यामुळे त्यांनी सामना अवघ्या एक तास १२ मिनिटांत संपवला. या विजयासह भांब्रीने यंदाच्या हंगामातील पहिले एटीपी अंतिम फेरीतील स्थान निश्चित केले आहे. आता विजेतेपदासाठी त्यांची लढत रोमेन आर्नेओडो आणि मार्क पोलमन्स या जोडीविरुद्ध होणार.

# आखाती युद्धामुळे वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशिप २०२६ स्थगित

■ बहरीन

**२०२६ ची** वर्ल्ड रेसलिंग चॅम्पियनशिप पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. ही स्पर्धा २४ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान बहरीनमध्ये होणार होती. मात्र युद्धामुळे हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

यूडब्ल्यूडब्ल्यूने बहरीन ऑलिम्पिक समिती आणि बहरीन रेसलिंग फेडरेशनसोबत चर्चा करून स्पर्धा स्थगित करण्याची घोषणा केली. आखाती प्रदेशातील संभाव्य संघर्ष, प्रादेशिक अस्थिरता आणि आंतरराष्ट्रीय प्रवासावर होणारा परिणाम लक्षात घेऊन खेळाडू, प्रशिक्षक, अधिकारी आणि चाहत्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे.

यूडब्ल्यूडब्ल्यूच्या निवेदनानुसार, स्पर्धेच्या अंतिम टप्प्यापर्यंत प्रतीक्षा करण्याऐवजी वेळेत निर्णय घेणे अधिक योग्य मानण्यात आले. त्यामुळे नव्या यजमान देशाचा शोध घेण्यासाठी आणि स्पर्धेचे नियोजन सुरळीतपणे करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे.

# चंदीगड स्पर्धेत एमआयटीच्या रोईंग संघाची रौप्य कामगिरी

■ पुणे



**चंदीगड** येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोईंग स्पर्धेत डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीच्या रोईंग संघाने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले.

या प्रतिष्ठित स्पर्धेत देशभरातील सुमारे ३० विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला होता. २००० मीटर अंतराच्या एलएम ४ मायनस (लाईट मेन कॉक्सलेस फोर) या शर्यतीत एमआयटीच्या संघाने सुरेख समन्वय, वेग आणि चिकाटी दाखवत दुसरे स्थान मिळवले.

या विजयी संघात योगेश ललित बोरोले, अनिकेत सुरेश कोलते, यशराज पोपट गायकवाड आणि स्वराज आघव या खेळाडूंचा समावेश होता. शर्यतीदरम्यान संघाने सुरुवातीपासूनच मजबूत लय राखत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. या यशामागे राष्ट्रीय रोईंग प्रशिक्षक संदीप भापकर यांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले. खेळाडूंच्या मेहनतीमुळे संघाने हे उल्लेखनीय यश संपादन केले.

या कामगिरीनंतर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनिता कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस. आणि इतर मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लॅब-ग्रोन हिऱ्यांनी निर्यातीमध्ये नैसर्गिक हिऱ्यांना मागे टाकले

■ सुरत

**भारताच्या** हिरे उद्योगात ऐतिहासिक बदल घडत असून, लॅब-ग्रोन हिऱ्यांनी प्रथमच निर्यातीच्या प्रमाणात नैसर्गिक हिऱ्यांना अधिकृतपणे मागे टाकले आहे. यामुळे जागतिक दागिने बाजारपेठेत मोठा बदल दिसून येत असून, सुरतच्या जागतिक ख्यातीच्या हिरे उद्योगाचे भविष्य नव्याने आकार घेत आहे.दशकानुदशके सुरत आणि मुंबई यांनी नैसर्गिक हिऱ्यांच्या जोरावर जागतिक बाजारपेठेत वर्चस्व निर्माण केले होते. जगातील जवळपास ९० टक्के हिरे कापणे आणि पॉलिश करण्याचे काम एकट्या सुरतमध्ये केले जाते. मात्र नैसर्गिक हिऱ्यांच्या व्यापारातील दीर्घ मंदीच्या पार्श्वभूमीवर लॅब-ग्रोन हिरे उद्योगासाठी मोठा आधार ठरत आहेत. या उद्योगामुळे कारखाने सुरू राहिले, लाखो रोजगार टिकून राहिले आणि आता निर्यातीमध्येही त्यांनी नैसर्गिक हिऱ्यांना मागे टाकले आहे.



लॅब-ग्रोन हिरे म्हणजे अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये मानवनिर्मित पद्धतीने तयार केलेले हिरे. हे दिसायला, रासायनिकदृष्ट्या आणि भौतिक गुणधर्मांच्या बाबतीत जमिनीत नैसर्गिकरीत्या सापडणाऱ्या हिऱ्यांसारखेच असतात. हे हिरे प्रयोगशाळेत उच्च तापमान आणि उच्च दाबाचा वापर करून किंवा केमिकल वेपर डिपॉझिशन तंत्रज्ञानाने बनवले जातात. लॅब-ग्रोन हिरे पूर्णपणे 'खरे' हिरे असतात. फरक फक्त इतकाच आहे की नैसर्गिक हिरे भूगर्भात अब्जावधी वर्षांत तयार होतात, तर लॅब-ग्रोन हिरे काही आठवड्यांत प्रयोगशाळेत तयार केले जातात. हे हिरे नैसर्गिक हिऱ्यांच्या तुलनेत जवळपास ५० ते ६० टक्क्यांनी स्वस्त असतात. हे हिरे देखील नैसर्गिक हिऱ्यांप्रमाणेच कट, कलर, क्लॅरिटी आणि कॅरेट या निकषांवर तपासले जातात.

देश विदेश

# चिनी कंपन्यांवर वर्षाच्या आत निर्बंध लादण्यासाठी अमेरिकेत विधेयक

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** चीनविरोधात कठोर भूमिका घेण्याच्या दिशेने पाऊल उचलले आहे. चीनच्या लष्करी नेटवर्कशी संबंधित कंपन्या आणि व्यक्तींवर जलद कारवाई करण्यासाठी अमेरिकेत नवे विधेयक सादर करण्यात आले आहे. या प्रस्तावानुसार, अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका मानल्या जाणाऱ्या चिनी कंपन्यांवर एका वर्षाच्या आत निर्बंध लादणे बंधनकारक असेल. रिपब्लिकन खासदार रिक स्कॉट आणि एलिस स्टेफानिक यांनी मांडलेल्या या विधेयकामुळे अमेरिका-चीन तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाचे सिनेटर रिक स्कॉट आणि प्रतिनिधी एलिस स्टेफानिक यांनी 'सीसीपी सँक्शन्स शॉट क्लॉक क्ट' नावाचे विधेयक मांडले आहे. या प्रस्तावित कायद्यानुसार, अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक मानल्या जाणाऱ्या चिनी कंपन्या, संस्था आणि व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्याची प्रक्रिया निश्चित केली जाणार आहे. या विधेयकातून चीनच्या लष्करी आणि आर्थिक प्रभावावर नियंत्रण ठेवण्याचा अमेरिकेचा उद्देश आहे.

# मिस व्हेनेझुएलाच्या चेहऱ्यावर हल्ला व्हिडिओ व्हायरल ! स्टायलिस्टला अटक

■ कान

**मिस** व्हेनेझुएला २०२५ किताब जिंकलेल्या २९ वर्षीय अँड्रिया डेल व्हॅले सौंदर्यवतीने तिच्या सेलिब्रिटी स्टायलिस्टने शारीरिक हल्ला केल्याचा आरोप केला आहे. कान चित्रपट महोत्सवादरम्यान हॉटेलच्या खोलीत झालेल्या वादानंतर त्याने हा हल्ला केला. यात तिच्या चेहऱ्यावर जखमा झाल्या. त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. तिच्या खोलीतून आरडाओरडा आणि झटापटीचे आवाज ऐकू आल्यानंतर पोलिसांना बोलावण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून स्टायलिस्ट गिओवानी लगुनाला ताब्यात घेतले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

व्हिडिओमध्ये तिच्या चेहऱ्यावर रक्ताच्या जखमा दिसत होत्या. ती खूप घाबरलेली दिसत होती. व्हिडिओमध्ये हॉटेलची खोली पूर्णपणे अस्ताव्यस्त होती. फर्निचर आणि इतर वस्तू इकडे-तिकडे पडलेल्या होत्या. तर लगुना खोलीच्या एका कोपऱ्यात बसलेला होता.

# जगातील ५० सर्वाधिक गरम शहरे भारतातच! चंद्रपूर दुसऱ्या क्रमांकावर

■ नवी दिल्ली

**देशभरात** सध्या उष्णतेची तीव्र लाट कायम असून नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. हवामानावर लक्ष ठेवणाऱ्या एक्यूआय.इन या वेबसाइटने जगातील सर्वाधिक उष्ण ५० शहरांची यादी जाहीर केली. विशेष म्हणजे या यादीतील सर्व ५० शहरे भारतातीलच असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या यादीत ओडीशातील बलांगीर शहराने ४५ अंश सेल्सिअस तापमानासह पहिला क्रमांक पटकावला. तर महाराष्ट्रातील चंद्रपूर आणि उत्तर प्रदेशातील प्रयागराज ही शहरे ४४ अंश तापमानासह संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर होती.याशिवाय छत्तीसगड, बिहार, तेलंगणा, हरियाणा आणि मध्य प्रदेशातील अनेक शहरांचाही या यादीत समावेश आहे. या भागांमध्ये तापमान ४२ ते ४३ अंश सेल्सिअसदरम्यान नोंदवण्यात आले.

उष्णतेच्या लाटेमुळे देशातील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, जगातील ५० सर्वाधिक उष्ण शहरांपैकी निम्म्याहून अधिक शहरे एकट्या उत्तर प्रदेशातील आहेत.

# आईवडील आयएएस अधिकारी मुलांना आरक्षणाची गरज काय ?

■ नवी दिल्ली

**मागासवर्गीयांमधील** आईवडील दोघे आयएएस अधिकारी असताना त्यांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ देण्याची गरज आहे का,असा महत्वपूर्ण सवाल सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासंबंधीच्या एका याचिकेवरील सुनावणीदरम्यान उपस्थित केला.

आरक्षणाच्या साह्याने शैक्षणिक आणि आर्थिक उन्नती साधून समाजाच्या वरच्या थरात गेलेल्या मागासवर्गीयांचे नंतरच्या टप्प्यात आरक्षण बंद व्हायला हवे,असे तोंडी मत याप्रसंगी न्यायालयाने व्यक्त केले.मागासवर्गीयांमधील क्रिमी लेअर आरक्षणाबाबतच्या याचिकेवर न्या.बी व्ही नागरत्ना आणि न्या. उज्जल भूयान यांच्या खंडपीठासमोर सध्या

सुप्रीम कोर्टाचा सवाल


सुनावणी सुरू आहे.त्यादरम्यान न्यायाधीशांनी आपली मते व्यक्त केली.आईवडील दोघे आयएएस अधिकारी आहेत.समाजाच्या आणखी वरच्या स्तरात जाण्याची त्यांना संधी आहे.असे असूनही पुन्हा आपण आपल्या मुलांसाठी आरक्षण मागत राहिलो तर आपण या चक्रातून कधी बाहेरच पडू शकणार नाही.

# चीनने समुद्रात उभारली जगातील सर्वात मोठी तरंगती पवनचक्की

■ बीजिंग

**चीनने** हरित ऊर्जा क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. दक्षिण चीन समुद्रात जगातील सर्वात मोठी 'सिंगल-युनिट' तरंगती पवनचक्की यशस्वीपणे उभारली आहे. ती अत्यंत भीषण हवामानातही सुरक्षित राहू शकते. या प्रकल्पामुळे खोल समुद्रातील पवनऊर्जेच्या वापराला नवे दार खुले झाल्याचे मानले जात आहे.

'थ्री गॉर्जेस पायलट' नावाच्या या पवनचक्कीची निर्मिती थ्री गॉर्जेस कॉर्पोरेशनने केली आहे. ही १६ मेगावॅट क्षमतेची पवनचक्की ग्वांगडोंग प्रांतातील यांगजियांग किनाऱ्याजवळ खोल समुद्रात बसवली आहे. ज्या ठिकाणी समुद्राची खोली जास्त असल्यामुळे पारंपरिक पद्धतीने पवनचक्की उभारणे शक्य नसते, अशा भागात हे युनिट उभारण्यात आले आहे.



या पवनचक्कीचा रोटर सुमारे २५२ मीटर व्यासाचा आहे तर तिच्या पात्यांचे टोक समुद्रसपाटीपासून २७० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पोहोचते. चीनने यापूर्वी उभारलेल्या फ्लोटिंग विंड टर्बाइनपेक्षा या मॉडेलमध्ये अधिक मजबूत स्ट्रक्चरल आणि डिजिटल सिस्टमचा वापर केला आहे. ही पवनचक्की अत्यंत खराब हवामानाचाही सामना करू शकेल, अशा पद्धतीने बनवण्यात आली आहे. तब्बल २० मीटर उंच लाटा आणि ताशी २६४ किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांनाही ती तोंड देऊ शकते. म्हणजेच 'कॅटेगरी-५' चक्रीवादळातही ही पवनचक्की सुरक्षित राहण्यास सक्षम आहे.

# वसई-विरार महापालिकेचे सफाई मित्र फ्लॉप दोन महिन्यांत केवळ ६१९ तक्रारी

■ वसई

**वसई-विरार** शहर महानगरपालिकेने शहराला कचरामुक्त करण्यासाठी सुरू केलेल्या पला थंड प्रतिसाद मिळाला आहे, मागील २ महिन्यात या पवर केवळ ६१९ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरात कचऱ्याची समस्या वाढली आहे. बहुतेक जण कचरा कुंडीत न टाकता थेट रस्त्यावर टाकतात, काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला ही कचऱ्याचे ढिगारे साचून राहतात. यामुळे आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता व दुर्गंधी निर्माण होते. ही समस्या सोडविण्याबरोबर शहर कचरामुक्त राहावे यासाठी पालिकेने दोन महिन्यांपूर्वी सफाई मित्र प सुरू केले होते. या पद्वारे नागरिकांना कर्चय्राशी संबंधित कुठलीही तक्रार करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. तक्रार मिळाल्यापासून २४ तासांच्या आत त्या जागेची स्वच्छता करण्यात येईल असा दावा पालिकेने केला होता. या पचा पालिकेने मोठा गाजावाजा देखील केला होता. मात्र या पला थंड प्रतिसाद मिळाला आहे. दोन महिन्यात सफाई मित्र पवर ६१९ तक्रारीप्राप्त झाल्या होत्या.

# वसई-विरारमधील १ लाख श्वानांचे निर्बिजीकरण करणार

पालिकेचा निर्णय

■ विरार

**श्वानांचा** उपद्रव रोखण्यासाठी वसई-विरार महापालिकेने शहरातील १ लाख श्वानांचे खासगी संस्थांच्या मदतीने श्वानांचे निर्बिजीकरण वेगाने करण्याचा निर्णय घेतला आहे. निर्बिजीकरण झालेल्या श्वानांसाठी वसईत साडेपाच कोटींचे निवारा केंद्र उभारले जाणार आहे. याशिवाय निर्बिजीकरण केलेल्या श्वानांची अचूक गणना आणि ओळख पटावी यासाठी गळ्यात जीपीएस ट्रॅकर असेलला कॉलर पट्टा लावण्यात येणार आहे.

वसई-विरार शहरात श्वानदंशाच्या घटना वाढल्या आहे. नुकताच श्वानदंशामुळे रेबीज होऊन एका मुलीचा मृत्यू झाला होता. चालू वर्षात वसई विरार शहरात जानेवारी ते एप्रिल या ४ महिन्यात श्वानदंशाच्या १५ हजार घटना घडल्या आहेत. श्वानांच्या उपद्रवाचा मुद्दा पालिकेच्या महासभेत गाजला. विरोधी पक्षांनी श्वानांचा उपद्रव रोखण्यास महापालिका अपयशी ठरत असल्याचा आरोप केला. शहरात १ लाख भटके श्वान आहेत. त्यापैकी ३० हजार श्वानांचे निर्बिजीकरण झाल्याची माहिती पालिकेने दिली. श्वानांचे निर्बिजीकरण अधिक वेगाने करण्यासाठी खासगी संस्थांची मदत घेतली जाणार असल्याचे महापौर अजीव पाटील यांनी सांगितले.



निर्बीजीकरणानंतर श्वानांची देखभाल करण्यासाठी वसईत निवारा केंद्र उभारले जाणार आहे. या निवारा केंद्रासाठी साडेपाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.या निवारा केंद्रात १ हजार श्वानांची ठेवण्याची सोय करण्यात आली आहे. त्यात श्वानांची देखभाल आणि वैद्यकीय उपचार करण्याची सोय केली जाणार आहे, अशी माहिती आरोग्य सभापती निलेश देशमुख यांनी दिली.

# विदर्भातील शाळा १५ जूनऐवजी २६ जूनला सुरू करण्याचा विचार

मंत्री पंकज भोयर यांची माहिती

■ मुंबई

**राज्यातील** वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर यंदा विदर्भातील शाळा सुरू होण्याची तारीख पुढे ढकलण्याचा शासन गंभीरपणे विचार करत आहे. दरवर्षीप्रमाणे १५ जूनला शाळा सुरू होण्याऐवजी यंदा त्या थेट २६ जूनपासून सुरू करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती मंत्री पंकज भोयर यांनी दिली.


राज्यात विशेषतः विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम असून, अनेक ठिकाणी तापमानाने ४७ अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला आहे. हवामान विभागाने विदर्भासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा



विचार करून शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे भोयर यांनी स्पष्ट केले. मंत्री पंकज भोयर म्हणाले की, विदर्भात सध्या उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. १० जूननंतरही उष्णतेची लाट कायम राहिल्यास शाळांच्या सुरूवातीची तारीख पुढे ढकलण्याचा विचार सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे १५ जूनऐवजी यंदा २६ जूनपासून शाळा सुरू करण्याबाबत शासन स्तरावर चर्चा सुरू आहे. तापमान दिवसेंदिवस वाढत असून त्याचा मोठा फटका नागरिकांना बसत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेचा विचार करूनच अंतिम निर्णय घेतला जाईल. १० जूननंतर परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील घोषणा करण्यात येईल.

# कसोटी क्रिकेटला सुरुवात

**१५ मार्च १८७७ रोजी पहिल्या कसोटी क्रिकेटची सुरुवात झाली. मेलबर्नमध्ये पहिला कसोटी सामना इंग्लंड व ऑस्ट्रेलिया संघात १५ मार्च १८७७ ते १९ मार्च १८७७ दरम्यान खेळवण्यात आला.**



**ह्या** सामन्यासाठी निकाल लागेपर्यंत खेळवला जाणार होता व ४ चेंडूचे एक षटक टाकले गेले. पहिला चेंडू टाकणारे होते इंग्लंडचे आल्फ्रेड शॉ. त्यांच्यासमोर होते ऑस्ट्रेलियन फलंदाज चार्ल्स बॅनरमन. त्यांनी त्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर कसोटी क्रिकेटमधली पहिली धाव घेतली. त्यांनीच दुसऱ्या दिवशी पहिले शतक पूर्ण करताना १६५ धावा केल्या.


या सामन्याला कसोटी दर्जा नंतर बहाल करण्यात आला. सुरुवातीला या सामन्याचे स्वरूप ऑल इंग्लंड वि. कम्बाइन्ड न्यू साउथ वेल्स अँड व्हिक्टोरिया इलेव्हन असे होते. दोन्ही संघ पूर्ण ताकदीनिशी उतरले नव्हते. ऑस्ट्रेलियाने हा सामना ४५ धावांनी जिंकला.

योगायोगाची गोष्ट अशी की, इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यातच पहिला आणि शतकमहोत्सवी कसोटी सामना खेळला गेला होता. या शतकमहोत्सवी सामन्याच्या तारखा १२, १३, १४, १५ (विश्रांती), १६ आणि १७ मार्च १९७७ अशा होत्या. या दोन्ही कसोटी सामन्यांचा निकालही सारखाच लागला होता. ऑस्ट्रेलिया- ४५ धावांनी विजयी. फरक एवढाच, की पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले होते ई. जे. ग्रेगरीने, तर शतकमहोत्सवी कसोटीत ग्रेग चॅपेलने. पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या ई. बॅनरमनने पहिल्या डावात (निवृत्त- जखमी) शतक (१६५ धावा) झळकावलं होतं. शतकमहोत्सवी कसोटीत ऑस्ट्रेलियाच्याच रॉडनी मार्शनं दुसऱ्या डावात शतक (नाबाद ११०) केलं होतं. पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या मिडिवटरनं पहिल्या डावात पाच व दुसऱ्या डावात एक असे एकूण सहा बळी, तर त्याचा सहकारी केंडाल याने पहिल्या डावात एक व दुसऱ्या डावात पाच बळी मिळवले होते. शतकमहोत्सवी कसोटीचा मानकरी होता डेनिस लिली. त्यानं पहिल्या डावात सहा, तर दुसऱ्या डावात पाच असे एकूण अकरा बळी मिळवले.



# हॉलीवूड अभिनेत्री अँजेलिना जोली

**अँजेलिना जोलीने १९८२ मध्ये सात वर्षाची असताना 'लूकिंग टू गेट आउट'या चित्रपटातून हॉलिवूडमध्ये पदार्पण केले. बहुतांश लोकांना १९८८ पर्यंत अँजेलिनाबाबत काहीच माहिती नव्हती. सुरुवातीला ती छोट्या पडद्यावरील अभिनेत्री होती, परंतु स्टार होण्यासाठी लागणारे सर्व गुण तिच्यात ठासून भरलेले होते. झालेही तसेच, आज तिने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे.**



**तिने** आतापर्यंत आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर एक ॲकॅडमी पुरस्कार, दोन स्क्रीन ॲक्टर्स गिल्ड अवॉर्ड आणि तीन गोल्डन ग्लोब पुरस्कार पटकावले आहेत. ती युनायटेड नेशन्स हाय कमिशन फॉर रिफ्युजीची गुडविल अँबॅसेडर आहे. सध्या तिला जगातील सर्वात सुंदर महिला अशी पदवी बहाल करण्यात आली आहे.

मिस्टर अँड मिसेस स्मिथ' या सिनेमात काम करताना पिट आणि जोली जवळ आले होते. त्यानंतर पिटने त्याची पत्नी अभिनेत्री जेनिफर ॲनिस्टनला घटस्फोट दिला होता.

जोलीचाही यापूर्वी दोनदा घटस्फोट झाला आहे. जॉन ली मिलरसोबत ३ वर्षाचा संसार केल्यानंतर तिने १९९९ मध्ये घटस्फोट घेतला होता आणि त्यानंतर अभिनेता बिली बॉब थॉर्नटनसोबत २ वर्षे लग्नगाठीत राहून २००२ मध्ये काडीमोड घेतला होता. जोली आणि ब्रॅड पीटने तीन मुलांना दत्तक घेतले असून त्यांना स्वत:ची तीन मुलेही आहेत.

फोर्ब्ज या नियतकालिकाने प्रसिद्ध केलेल्या यादीत जगातील शंभर श्रीमंत सेलिब्रेटींमध्ये पहिल्या क्रमांकावर अँजेलिना जोलीचे नाव आहे. तसेच तीन वेळा गोल्डन ग्लोब, दोन वेळा स्क्रीन ॲक्टर्स गिल्ड पुरस्कार अँजेलिना जोलीला मिळाले आहेत.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# शोभा भागवत

## बालमानसशास्त्राच्या अभ्यासिका आणि गरवारे बालभवनच्या संचालिका



**शोभा भागवत यांचा जन्म २९ ऑगस्ट १९४७ रोजी झाला. शोभा भागवत या प्रामुख्याने मुलांसंबंधी पुस्तके लिहिणाऱ्या मराठी लेखिका म्हणून ओळखल्या जात. लहान मुलांचा अभ्यासाव्यतिरिक्त खेळ आणि अन्य ॲक्टिव्हिटीमधून विकास व्हावा, त्यांच्यातील अंगभूत, मूलभूत गुणांना वाव मिळावा आणि त्यांना मूल्यशिक्षणाचे धडे मिळावेत यासाठी त्यांनी सारसबागेसमोर 'गरवारे बालभवन'ची स्थापना केली.**

त्याच्या त्या संस्थापक - संचालिका होत्या. त्यांनी पुण्यातील बालभवनसाठी खूप मोलाचे योगदान दिले. शोभा भागवत पुण्यातील अक्षरनंदन शाळेसह मुलांच्या जडणघडणीसाठी प्रयत्नशील असलेल्या अनेक संस्थांसाठी आधारवड ठरल्या. गरवारे बालभवनची जागा महापालिकेकडून दीर्घ कराराने घेण्यात आली आहे. तो करार संपुष्टात आल्यानंतर महापालिकेने ती जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आणि त्यांना नोटीस दिली. ही जागा महापालिकेने पर्वतीवर रोप-वे करण्यासाठी ताब्यात घेण्यात येणार असल्याचे कारण दिले. तसेच उर्वरित जागेत महापालिकेचे काही प्रकल्प करण्यात येणार होते. एकूणच ही मोक्याची जागा ताब्यात घेण्याचा घाट लोकप्रतिनिधींनी घातला होता. मात्र त्याला शोभाताई, पालकांनी, विविध संस्था, संघटनांनी तीव्र विरोध केला आणि त्या जागेचा करार वाढवून मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात आले. या लढ्याला यश आले आणि महापालिकेचा प्रकल्प बारगळला. चित्रकार आभा भागवत ही त्यांची मुलगी होत.

भागवत यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यात आपली मुलं (मार्गदर्शनपर), गंमतजत्रा (बालसाहित्य), गारांचा पाऊस (मार्गदर्शनपर), बहुरूप गांधी (अनुवादित बालसाहित्य, मूळ इंग्रजी लेखक - अनु बंदोपाध्याय). या पुस्तकाला जवाहरलाल नेहरूंची प्रस्तावना आहे., मुल नावाचं सुंदर कोडं (मुलांच्या बोलांचे संकलन), विश्व आपलं कुटुंब (अनुवादित, मूळ इंग्रजी लेखक - कृष्णकुमार). - मार्गदर्शनपर., सारं काही मुलांसाठी (मार्गदर्शनपर) यांचा समावेश आहे. शोभा भागवत यांचे ८ डिसेंबर २०२३ रोजी निधन झाले.

# शेख हसीनांच्या घरवापसीसाठी बांगलादेश सरकार प्रयत्नशील

## गृहमंत्र्यांची माहिती

■ ढाका -

**बांगलादेशच्या** माजी पंतप्रधान शेख हसीना यांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे मायदेशी परत आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती बांगलादेशचे गृहमंत्री सलाहुद्दीन अहमद यांनी दिली. मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतरही आपण लवकरच मायदेशी परतू, अशी आशा शेख हसीना यांनी अलीकडेच व्यक्त केली होती. त्यानंतर गृहमंत्र्यांनी ही भूमिका स्पष्ट केली आहे.

सलाहुद्दीन अहमद म्हणाले की, आम्हाला शेख हसीना यांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे देशात परत आणायचे आहे. त्यांना परत यायचे असेल, तर त्यामध्ये कोणताही कायदेशीर अडथळा असल्याची माहिती आमच्याकडे नाही.

ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या आंदोलनानंतर सत्तेतून पायउतार झाल्यापासून शेख हसीना भारतातच आहेत. त्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम प्रशासनाने कार्यकारी आदेशाद्वारे अवामी लीग पक्षावर बंदी घातली. बांगलादेशच्या पुनर्रचित आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात शेख हसीना यांच्याविरोधात खटला सुरू करण्यात आला. नोव्हेंबर २०२५ मध्ये या न्यायाधिकरणाने त्यांच्या अनुपस्थितीत त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती. मात्र, या शिक्षेनंतरही शेख हसीना यांनी लवकरच मायदेशी परतण्याची आशा व्यक्त केल्याने बांगलादेशातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

# सपकाळ हटाव काँग्रेस बचाव

■ सोलापूर

**सोलापूर** काँग्रेस पक्षाच्या नवीन जिल्हा व शहर कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांच्या निवडीवरून पक्षांतर्गत वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे काही जुने पदाधिकारी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कार्यशैलीवर नाराज आहेत.

या नाराज पदाधिकाऱ्यांनी आज 'सपकाळ हटाव, काँग्रेस बचाव' असे बॅनर झळकवत सपकाळ यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटवण्याची मागणी केली.


# दिवंगत तहसीलदार गिड्डे यांच्या पत्नीला सरकारी नोकरी दिली

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील कैजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा गेल्या महिन्यात रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. आता महाराष्ट्र सरकारने त्यांच्या पत्नीची सहानुभूती तत्त्वावर सोलापूर येथे नियुक्ती केली आहे. गिड्डे यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दीड महिन्यात हा निर्णय घेण्यात आला.

९ एप्रिल रोजी लातूर-अंबाजोगाई रस्त्यावर कारने प्रवास करत असताना गिड्डे यांचा अपघात झाला होता. वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार उलटली. अपघात अत्यंत भीषण होता आणि त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. रेणापूर पोलिसांनी त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पत्नी नेहा गिड्डे यांनी सहानुभूती तत्त्वावर नोकरी देण्याची सरकारकडे विनंती केली होती. बीडऐवजी सोलापूर येथे नियुक्ती द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली होती.

# गुरुग्राममध्ये रॅपिड मेट्रो ठप्प प्रवासी ट्रॅकवरून चालले



■ गुरुग्राम

**गुरुग्राम** मध्ये अनेक भागांमध्ये काल वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे रॅपिड मेट्रोची सेवाही तासाभराहून अधिक काळ ठप्प राहिली. सेक्टर ७२ मधील वीज उपकेंद्रातील मुख्य ट्रान्सफॉर्मरला आग लागल्यानंतर ही समस्या निर्माण झाली. या आगीमुळे सात प्रमुख उपकेंद्र बंद करण्यात आली. मेट्रो सेवा अचानक थांबल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. प्रवासी मेट्रो ट्रॅकवरून चालत स्टेशनला पोहोचले.

उकाडा आणि दाट अंधारात तब्बल एक तास मेट्रो हलली नाही, तेव्हा प्रवाशांचा संयम सुटला. त्यानंतर जीव धोक्यात घालणारा प्रवास सुरू झाला. महिला, मुले आणि वृद्ध प्रवासी मेट्रोच्या आपत्कालीन दरवाजांतून बाहेर पडून ट्रॅकवरून चालू लागले.

# दिवा शहरला स्वतंत्र पिनकोड मंजूर टपाल-बँकिंग अडचणी दूर होणार

■ ठाणे

**मध्य** रेल्वेवरील वेगाने विकसित होणारे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवा शहराला अखेर स्वतंत्र पिनकोड मिळाला आहे. केंद्र सरकारने दिव्यासाठी अधिकृतपणे ४००६११ हा नवीन आणि स्वतंत्र पिनकोड मंजूर केला असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली आहे.

यापूर्वी दिवा परिसरासाठी मुंब्रासोबतच ४००६१२ हा एकच पिनकोड वापरला जात होता. या सामायिक पिनकोडमुळे दिवावासीयांना टपाल सेवा, बँकिंग व्यवहार, ऑनलाईन पडताळणी प्रक्रिया आणि विविध सरकारी कागदपत्रांबाबत अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. टपाल उशिराने मिळणे, चुकीच्या पत्त्यावर पत्र जाणे, ऑनलाईन सेवांमध्ये तांत्रिक अडथळे निर्माण होणे, अशा समस्यांमुळे नागरिक त्रस्त होते.

नवीन पिनकोड लागू झाल्यानंतर या सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी दूर होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे टपाल आणि कुरिअर सेवा अधिक सुरळीत होण्यासोबतच दिवा शहराला स्वतंत्र प्रशासकीय आणि भौगोलिक ओळखही मिळणार आहे.

# उल्हासनगरमध्ये शिंदे गटाला धक्का नगरसेवक विकी सिंग लबाना अपात्र

■ मुंबई

**उल्हासनगर** महानगरपालिकेत शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. नगरसेवक विकी सिंग लबाना यांचे नगरसेवकपद अधिकृतपणे रद्द करण्यात आले आहे. जिल्हा जातपडताळणी प्रमाणपत्र समिती, नाशिक यांनी त्यांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरवल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

विकी सिंग लबाना हे उल्हासनगर महानगरपालिका निवडणुकीत पॅनल क्रमांक ६-अ मधून निवडून आले होते. त्यांनी इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातून निवडणूक लढवली होती. त्यासाठी त्यांनी बंजारा समाजाचे जात प्रमाणपत्र सादर केले होते. मात्र निवडणुकीनंतर त्यांच्या जातप्रमाणपत्राबाबत तक्रारी दाखल झाल्यानंतर पडताळणी प्रक्रिया सुरू करण्यात आली.जिल्हा जातपडताळणी प्रमाणपत्र समितीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करताना संबंधित कागदपत्रे आणि नोंदींची तपासणी केली.

# अपघातग्रस्तांना तातडीची मदत

■ मुंबई

**सार्वजनिक** बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील खड्डे, उघडी मॅनहोल आणि देखभालीअभावी होणारे अपघात व मृत्यूंच्या घटनांची गंभीर दखल घेत राज्य सरकारने मदत आणि कार्यवाहीसाठी राज्यस्तरीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर यासंदर्भातील शासन परिपत्रक जारी करण्यात आले.

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने राज्य

## उच्चस्तरीय समिती स्थापन

सरकारला यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) सदस्य सचिव म्हणून काम पाहतील, तर संबंधित जिल्ह्यातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सदस्य असतील.

समितीकडे प्राप्त होणाऱ्या अपघात प्रकरणांचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन न्यायालयाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. अपघातग्रस्तांना मदत देण्याची प्रक्रिया अधिक वेगवान, सुसूत्र आणि पारदर्शक करण्याचा उद्देश असल्याचे शासन परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# आंबोलीत रोज रात्री वीजपुरवठा खंडित

■ आंबोली

**सावंतवाडी** तालुक्यात सध्या वीजपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, पावसाच्या काही हलक्या सरी कोसळल्या तरी वीजसेवा खंडित होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. हा केवळ स्थानिक कर्मचाऱ्यांचा अपयशाचा विषय नसून सावंतवाडीत बसून परिस्थितीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय कारभाराचे हे उदाहरण असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेषतः आंबोलीत गेल्या दहा दिवसांपासून दररोज रात्री वीज खंडित होत असल्याने पर्यटन व्यवसायावर परिणाम होत आहे. पर्यटन हंगाम सुरू असताना येथील हॉटेल, होम स्टे आणि इतर निवास व्यवस्थांचे



मोठे नुकसान होत असून, पर्यटकांनाही गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय गेळे, चौकुळ, दाणोली, सातोळी, बावळाट यांसह तालुक्यातील अनेक गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

# पाऊस संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांना रेनकोट तरी मिळणार का?

## स्थायी समितीत सदस्यांचा सवाल

■ मुंबई

**पावसाळ्यापूर्वी** विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप करण्याच्या प्रस्तावावरून स्थायी समितीच्या बैठकीत जोरदार चर्चा झाली. रेनकोट खरेदी प्रक्रिया, त्यांचा दर्जा आणि वितरणातील संभाव्य विलंब यावर सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. पाऊस संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांना रेनकोट मिळणार का? असा सवाल स्थायी समितीत सदस्यांनी केला.

स्थायी समिती सदस्य यशवंत किल्लेदार यांनी रेनकोटच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित करत, हा रेनकोट म्हणजे एक दिवस वापरा आणि फेकून द्या, अशी अवस्था आहे. त्याऐवजी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करावेत अशी सूचना केली. रेनकोट खरेदी जेम पोर्टलद्वारे करण्यात येणार असून, पुरवठ्यासाठी सुमारे ४५ दिवस लागणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. यावर काँग्रेसचे गटनेते अश्रफ आजमी यांनी आक्षेप घेत, पाऊस संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांना रेनकोट मिळणार तरी का? ही निविदा प्रक्रिया म्हणजे मॅच फिक्सिंग आहे का? असा सवाल उपस्थित केला.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांनी सांगितले की, रेनकोट खरेदीसाठी जेम पोर्टलवर सात निविदाकारांनी प्रतिसाद दिला होता. मात्र, त्यापैकी सहा जणांची कागदपत्रे अपूर्ण अथवा अयोग्य असल्याने त्यांची निविदा ४८ तासांत रद्द करण्यात आली. केंद्र सरकारने २०१६ मध्ये जेम पोर्टल प्रणाली लागू केल्यानंतर मुंबई महापालिकेच्या रेनकोट खरेदीत तब्बल २ कोटी ३० लाख रुपयांची बचत झाल्याचा दावा त्यांनी केला.

# शिवसेना फुटीचे खापर माझ्यावर नको बच्चू कडूंचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

■ मुंबई

**प्रहार** संघटनेतील सोलापूर, परभणी आणि धाराशिव जिल्ह्यातील काही कार्यकर्त्यांनी नुकताच उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत उबाठात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी बच्चू कडू यांच्यावर टीका करताना, बच्चू कडूला घरी बोलावून मंत्री केले ही माझी चूक झाली. तो जुना शिवसैनिक होता, पण लोभापायी गेला असे वक्तव्य केले होते. त्यानंतर शिंदे गटाचे विधान परिषदेचे सदस्य बच्चू कडू यांनी पत्रकार परिषद घेत शिवसेना फुटीचे खापर माझ्यावर फोडू नका, असे प्रत्युत्तर दिले.

पत्रकार परिषदेत बच्चू कडू म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी मला कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता. मला फक्त राज्यमंत्रिपद देण्यात आले. माझ्याऐवजी शंकरराव गडाख यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. एकनाथ शिंदे यांनीच माझी उद्धव ठाकरे यांच्यासोबत भेट घालून दिली होती. मी स्वतः त्यांच्या घरी जाऊन त्यांना पाठिंबा दिला होता. आमच्या मतांमुळेच उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. त्यांना स्वतः मुख्यमंत्री व्हायचे होते.

# चीनमधील कोळसा खाणीत गॅस स्फोट! ९० जणांचा मृत्यू



■ बीजिंग

**चीनच्या** उत्तरेकडील शांक्सी प्रांतातील एका कोळसा खाणीत झालेल्या गॅसच्या स्फोटात मृतांचा आकडा ९० पर्यंत वाढला आहे. ही दुर्घटना काल रात्री क्यूनयुआन काउंटीमधील लिउशेन्यू कोळसा खाणीत घडली. त्यावेळी सुमारे २४७ कामगार खाणीत काम करत होते.

या दुर्घटनेनंतर चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी तातडीने बचावकार्य वेगाने करण्याचे आदेश दिले आहेत. जखमींवर तातडीने उपचार करणे, शोध व बचावकार्य सुरू ठेवणे तसेच घटनेच्या कारणांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच कायद्यानुसार जबाबदारी निश्चित करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनीही अधिकाऱ्यांना तातडीने आणि अचूक माहिती जाहीर करण्याचे आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.


# अहिल्यानगरमध्ये आमरस खाल्ल्याने एकाच कुटुंबातील ७ जणांना विषबाधा

■ अहिल्यानगर

**अहिल्यानगर** येथे आमरस खाल्ल्याने एकाच कुटुंबातील सात जणांना विषबाधा झाली. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शेवगाव शहरातील आरे वस्ती येथे ही घटना घडली.

आरे वस्तीमध्ये जायभाय कुटुंब वास्तव्यास आहे. त्यांनी बाजारातून आंबे आणून त्याचा आमरस केला होता. कुटुंबातील सर्वांनी हा आमरस खाल्ला. पण काही वेळातच चक्कर येणे, उलट्या अशी लक्षणे दिसू लागली. कुटुंबातील ४ वर्षांचा चिमुरड्याचाही यात समावेश होता. या कुटुंबियांना अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. या घटनेनंतर फळे पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाईड किंवा अन्य रसायनांचा वापर होत असल्याच्या संशयावरून परिसरातील फळविक्रेत्यांवर धाडी टाकल्या.

# खंडाळा तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस ! ओढे दुथडी भरून वाहिले



■ पुणे

**मुंबईसह** पुणे, कोकण, सातारा, सांगली आणि राज्यातील अनेक भागांत मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्याच्या पश्चिम भागात मुसळधार आणि ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. तर अनेक ठिकाणी ओढे दुथडी भरून वाहत आहेत.

खंडाळा तालुक्यातील कण्हेरी परिसरात वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि जोरदार पावसामुळे मोठे नुकसान झाले. असवली, कण्हेरी, लोहोम, कर्नवडी, घाडगेवाडी, अतिट, कवठे आणि जवळे परिसरात मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि वीटभट्टी चालक अडचणीत आले आहेत. अतिट गावात वीज पडून एका गायीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत शेतकरी रामदास जाधव यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच कण्हेरी परिसरातील वीटभट्ट्यांवरील कच्च्या विटा पावसात भिजल्याने सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरूर, आंबेगाव, खेड आणि जुन्नर तालुक्यातील अनेक गावांनाही वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा फटका बसला. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह गारपीटही झाली. अचानक कोसळलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. कोकणासह पुणे, नाशिक, सोलापूर, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतही पावसाच्या सरी कोसळल्या. वाढत्या उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी अवकाळी पावसामुळे शेती आणि व्यवसायांचे नुकसान झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.










# नवाकाळ शब्दकोडे-१६१५



**आडवे शब्द –**

१. अप्पलपोटे, स्वार्थी वागणे ५. टीका, टिप्पणी, शेरेबाजी ७. वाया गेलेले रडणे, व्यर्थ श्रम १२. उत्सवाचा दिवस १३. भूमी, धरणी १५. माणूस १६. शिंपल्यातील प्राणी १७. बाज विणण्यासाठी वापरली जाणारी अखंड कापडी पट्टी १९. अवघड, दुस्तर २१. घोड्यांचा खरारा आणि इतर सेवा करणारा २२. इतर ठिकाणी, इतरत्र २३. जमीन मोजण्याचे जुने परिमाण, बलराज सहानी आणि निरूपा रॉयचा देश-परदेशात गाजलेला सिनेमा- 'दो ×× जमीन' २४. सैन्याला केलेला पुरवठा, नवीन कुमक २५. सुंदर, चांगले २६. ताणाखाली असलेला २८. विरोध, असंमती ३१. संधी, मोका ३२. परिणाम, परिणती, प्राप्ती ३४. वाहन चालविणारा, सूत्रधार ३६. लागून, निकट, समीप ३८. पोरका ४१. गोंगाट, अनेक आवाज एकत्र होऊन निर्माण होणारा गोंधळ ४२. बेडकांचे ओरडणे ४४. संस्थेला साठ वर्षे पूर्ण झाल्यावर होणारा उत्सव, पूर्वी नाटकाच्या प्रयोगांचाही साजरा होत असे ४५. नाविक ४७. बरगड्या ५२. प्रथा, रूढी ५६. मूलभूत ५७. हेळसांड, दुर्लक्ष ६०. मोठी घटना ६१. गुपित ६३. अगदी अल्प अथवा किंचित अंश ६४. म्हणून, याकरता ६६. नित्य ६८. निग्रह, गायनातील एक राग ७०. उपद्रवी वनस्पती ७१. साद ७२. जावळा ७३. पुत्र ७४. बदल ७६. चिंतन ७९. नशीब ८१. कुक्कुट ८३. नित्य, सतत ८६. मद्यपी ८८. ऐसपैस ९०. प्रारब्धदेवता ९१. महाभारतात मगध देशाचा राजा, भीमाने याला ठार मारले ९४. 'लेकी बोले सुने लागे-' असे उपरोधिक बोलणे ९५. अपशब्द ९६. संयम ९७. धोब्याकडून धुवून इस्त्री करून आलेला कपडा ९८. शिष्य ९९. सावळागोंधळ

**उभे शब्द –**

१. बैठक, बसण्याचे साधन २. मराठी बाणा- 'मोडेन ×× ×××× ××' ३. लहान घोडा, शिंगरू ४. यातून झाड उगवते ५. चित्त, अंतःकरण ६. मुख्य, नेता ७. दुजोरा ८. चांदी ९. संमती १०. फुलाची पाकळी, सैन्याची तुकडी ११. वरवधू १४. ज्योतिषातील बारा राशींपैकी मत्स्य चिन्ह असलेली रास १८. संन्यासी वृत्तीचा १९. खराबी, नादुरुस्ती २०. शेंगेचे फोलपट २२. अग्रभागी असलेला २५. सिंहाचे पिल्लू २७. होळीचा सण २९. गोजी, लहान गाय ३०. चिकार ३३. सरोवर, तळे ३४. गती, प्रेरणा ३५. कट्टर ३७. जलप्रवासाचे छोटे साधन ३९. अंगाला सुटलेले कापरे ४०. किंचित ४३. वस्त्र ४६. कष्टमय ४८. घृत ४९. न मागता मिळालेले ५०. गूढ ५१. अरण्य ५३. रंगवलेले ५४. श्रीराम ५५. पराभूत, नेस्तनाबूत ५८. तृण, चारा ५९. भंगूर, संपणारे ६२. घोडा, अश्व ६४. हाड, हाडे ६५. गर्दी टाळणारा, एकांतात रमणारा ६६. नमस्कारासाठी हिंदीतील शब्द ६७. पाणी प्यायची इच्छा ६९. प्रणाम ७३. मोठी संधी, पर्वणी ७५. स्नानपात्र ७७. धुंदी ७८. दयाळू ८०. नालस्ती ८२. घराणे ८३. शर्त ८४. कुंपण ८५. सोय, प्रबंध ८७. चंदेरी ८८. धनुष्याची दोरी ८९. स्तुती ९०. लादले गेलेले, अनिवार्य ९२. बांध ९३. ढग ९५. प्रसादाला केला जाणारा रव्याचा गोड पदार्थ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. भाटी ३. चढाओढ ६. धूळफेक ८. हकालपट्टी ११. बकासूर १३. लागवड १४. फुलका १५. टवाळ १६. गूळ १८. मावशी २०. यार २२. धाक २३. डास २४. पाशवी २६. कथा २६अ. भयानक २८. बारका ३०. पौत्र ३१. रांजण ३२. हाल ३३. विधूर ३४. घोर ३५. मूग ३६. वखार ३८. साथी ३९. उलगडा ४२. नान ४६. मामा ४७. कलप ४९. भवसागर ५१. देहावसान ५२. पळपुटा ५४. थट्टा ५५. जमा ५६. खंबीर ५७. लक्ष ५८. छान ६०. कर्ण ६१. धोंड ६२. वाहक ६४. पारध ६६. दानशूर ६८. नायनाट ७०. कपी ७१. मखर ७३. काडीमोड ७४. वाटप ७५. पनीर ७९. चंदी ८०. टपाल ८२. कोलकाता ८४. अर्धचंद्र ८७. चटकन ८९. वचपा ९१. वग ९२. गर्जना ९३. दीडशहाणा ९६. वावटळ ९८. द्वारका १००. नीड १०१. जबाबदार १०२. शीळ १०३. घसट

**उभे शब्द :** १. भावड्या या भक्तसाठी देव करी काम २. टीका ३. चर ४. ओलावा ५. ढगळ ६. धुडगूस ७. फेरी ८. हलका ९. काका १०. पडाव १२. सुत १५. टक १७. कृश १८. माथा १९. शीतल २१. रया २२. धाकधूक २३. डाका २४. पात्र २५. वीरांगना २६. कणव २७. नवी २९. रमल ३०. पौर ३२. हार ३४. घोडा ३७. खानसामा ३९. उमा ४०. गव्हाळ ४१. स्थूल ४३. नभ ४४. दूरस्थ ४५. केवळ ४६. मानखंडना ४७. कटाक्ष ४८. पथकर ५०. वजनदार ५२. परवाना ५३. पुलक ५९. त्रिशूळ ६३. हटवादी ६४. पापी ६५. धमनी ६७. सामोसा ६९. यत्न ७०. कपट ७२. खर ७५. पलटवार ७६. कालवश ७७. नेता ७८. अर्धवट ७९. चंद्र ८१. पाच ८३. बोच ८५. चंगळ ८६. अर्ज ८८. नदी ८९. वहिनी ९०. पावा ९२. गरबा ९४. डग ९५. हापूस ९७. वही ९८. द्वार ९९. काशी




**रविवार २४/०५/२०२६ ते शनिवार ३०/०५/२०२६**

## ● मेष

**आठवड्याची** सुरुवात थोडी कंटाळवाणी वाटेल. उत्तरार्ध चांगला जाईल. प्रतिस्पर्ध्यावर मात करता येईल. तुमच्यामधील ऊर्जा चांगली राहणार आहे. नियोजनपूर्वक कृतीला महत्त्व द्यावे. घाईगडबडीने, अतिधाडसीपणाने निर्णय घेऊ नका. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. खर्चावर नियंत्रण न ठेवल्यास बचत राखणे अवघड जाईल. बोलण्यामध्ये स्पष्टता राहिली तरी सौम्यपणाही ठेवावा. स्वभावामध्ये जिद्द वाढेल, परंतु हट्टीपणा नियंत्रणात ठेवा.

घरामधले वातावरण तप्त राहणार आहे. सर्वांना सांभाळून घेऊन पुढे चालावे लागेल. सुसंवाद अतिशय महत्त्वाचा राहील. संतती, जोडीदाराशी मतभेद राहिले तरी चर्चेने मार्ग निघेल. कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना संयम राखावा लागेल. तुमची प्रतिमा जपा.

कार्यक्षेत्रामध्ये स्पर्धात्मक वातावरणात टिकून राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर योग्य ठरेल. अनपेक्षित घटनांना सामोरे जावे लागणार आहे. काही धाडसी निर्णय घ्यावे लागणार आहे. त्यासाठी तुमच्या कार्यक्षेत्रातील अनुभवी लोकांचा तसेच कायदेतज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. नोकरदारांनी बोलताना खबरदारी घ्यावी. कामाच्या स्वरूपामध्ये अचानक बदल होऊ शकतो.

वाहन चालवताना काळजी घ्या. उष्णतेचे आजार होऊ शकतात.

**शुभ दिनांक :** २६, २८.

## ● वृषभ

**आठवड्याची** सुरुवात मानसिक दडपणाखाली होईल. उत्तरार्धात शत्रूवर विजय मिळवता येईल. मनातील नकारात्मक विचारांवर नियंत्रण ठेवून पुढच्या कामांचे योग्य नियोजन करावे. त्यामुळे गोष्टी नियंत्रणात आणता येतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. लाभाचे प्रमाण वाढेल. तसेच आर्थिक प्राप्तीसाठी नवीन मार्ग उपलब्ध होतील. पूर्ण विचारांती, तज्ज्ञांच्या सल्ल्याने निर्णय घ्यावेत. नियमांचे उल्लंघन त्रासदायक ठरेल. बंडखोरीचे विचार नियंत्रणात ठेवा.

कुटुंबातील समस्या तुम्हाला पुढाकार घेऊन सोडवाव्या लागतील. त्यामध्ये तुम्हाला यश मिळेल. बोलताना सौम्य शब्दांचा वापर करा. मुले व भावंडांशी मतभेद होऊ शकतात. जोडीदाराचा सल्ला विचारात घ्यावा. कार्यक्षेत्रामध्ये भांडवल उभे करता येईल. जुनी येणी वसूल करता येतील. नवीन तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी ठरणार आहे. नोकरदारांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. कामाच्या ठिकाणी वाद टाळा. चतुराईने समस्येवर मार्ग काढता येईल. कामाचे श्रेय मिळाल्यामुळे प्रतिष्ठेत वाढ होईल.

मधुमेह, उष्णतेचे विकार यासंबंधीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** २८, २९.

## ● मिथुन

**सावधगिरीने** निर्णय घेऊन कृती केल्यास अनेक गोष्टी साध्य करू शकाल. आठवड्याच्या सुरुवातीला अचानक नवीन संधी, नवीन व्यवहार समोर येतील. काही गोष्टी मनाविरुद्ध कराव्या लागतील तरीही त्यातून फायदाच होणार आहे. लाभाचे प्रमाण चांगले राहील. आत्मविश्वास ढळू देऊ नका. गुरुकृपेने मनासारख्या गोष्टी घडवून आणू शकाल. नियम काटेकोरपणे पाळावेत. मनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील. मोठी गुंतवणूक सध्या टाळावी. कामाचा वेग वाढवावा लागेल.

घरापासून लांब जाण्याचा योग आहे. कामानिमित्त प्रवास होतील. तरीही घरची जबाबदारी टाळता येणार नाही. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. वादविवादाचे प्रसंग चतुराईने टाळावेत. जोडीदाराचे सहकार्य राहील. प्रेमीजनांच्या विवाहाची सकारात्मक बोलणी होतील.

कार्यक्षेत्रामध्ये सावधगिरीने पाऊल उचलावे लागेल. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. सहकारी वर्गाचे सहकार्य उत्तम राहील. लाभाचे प्रमाण व कष्टामध्येही वाढ होईल. भागीदारीतील संघर्ष टाळावा. नोकरदारांनी आपले काम चोख पार पडावे. अतिधाडस टाळावे.

आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रतिकारशक्ती वाढवावी लागेल.

**शुभ दिनांक :** २४, २५.

## ● कर्क

**आठवड्याच्या** मध्यावर तुम्हाला नवीन संधी मिळणार आहे त्यासाठी तयार राहा. भावना आणि व्यवहार यामध्ये समतोल साधावा लागेल. मनामध्ये द्वंद्वामुळे निर्णय घेण्यास उशीर होऊ शकतो. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. इच्छाशक्ती मजबूत ठेवा. त्या जोरावर अनेक कामे पार पाडू शकाल. लाभाचे प्रमाण चांगले असले तरी खर्चावर बंधन आवश्यक आहे. तुमची ऊर्जा वाया जाणार नाही याकडे लक्ष द्या. वाणीवर नियंत्रण ठेवा.

कुटुंबासाठी अचानक जास्तीचा खर्च होईल. गृहसजावटीसाठी खर्चाची तरतूद करावी. मुलांची प्रगती समाधान देईल. पालकांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. जोडीदाराचा तुमच्या कामात सहभाग राहील. भावंडे व तुमच्यामध्ये अहंकार येऊ देऊ नका.

कार्यक्षेत्रामध्ये वेगवान हालचाली होतील. काही धाडसी निर्णय घ्यावे लागतील. उत्तम नियोजन व विरोधकांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. दुसऱ्यांवर अवलंबून राहता येणार नाही. नोकरदारांना वरिष्ठांच्या मतानुसारच काम करावे लागेल. मानसिक आरोग्य सांभाळा.

**शुभ दिनांक :** २५, २६.

## ● सिंह

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच तुमच्या राशीतून चंद्राचे भ्रमण होत आहे. त्यामुळे सुरुवात चांगली होईल. एकंदरीत हा आठवडा समाधानकारक आहे. उत्तरार्धात प्रवास होईल. राशीस्वामी रवी कर्मस्थानी आहे याचा फायदा तुम्हाला होणार आहे. कामाची व्याप्ती व धनाची आवक वाढेल. आर्थिक गुंतवणूक मात्र सध्या टाळावी. तुमच्याकडून कुठलीही चूक होऊ नये यासाठी सतर्क राहावे. अति आत्मविश्वास व अति धाडस टाळावे. कामामध्ये अडथळे आले तरीही हार मानू नका. कारण भाग्य तुमच्या कर्माला साथ देणार आहे. या सर्व ग्रहभ्रमणाचा उपयोग करून घ्या. इच्छाशक्ती चांगली ठेवा.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. मित्र, भावंडे व मुलांबरोबर चांगला वेळ घालवाल. सहलीचे आयोजन होईल. जोडीदाराबरोबर गैरसमज होणार नाही यासाठी काळजी घ्या.

कार्यक्षेत्रात अडथळ्यांची शर्यत असली तरी तुमचे नेतृत्वकौशल्य व धडाडी उपयोगी पडेल. व्यवसायवृद्धीसाठी तुमच्या सखोल ज्ञानाचा फायदा होईल. नोकरदारांसाठी आर्थिक दृष्टीने चांगला काळ आहे. भागीदारीत व्यवसाय असल्यास पारदर्शक व्यवहार ठेवा. त्यामध्ये अचानक घडामोडी घडू शकतात.

**शुभ दिनांक :** २४, २५, २९.

## ● कन्या

संमिश्र ग्रहमानाचा आठवडा आहे. मनामध्ये नैराश्य किंवा गोंधळाची स्थिती येऊ देऊ नका. कामाचा प्राधान्यक्रम ठरवून त्याप्रमाणे त्यावर लक्ष केंद्रित करावे. कामाची गती वाढवावी लागेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. तज्ज्ञांच्या सल्ल्याने छोटी आर्थिक गुंतवणूक करण्यास योग्य काळ आहे. राशीस्वामी बुध भाग्यस्थानी आहे. अडथळे आले तरी त्यावर मात करण्याची क्षमता तुमच्याकडे असेल.

घरातील वातावरण चांगले राहील. कुटुंबामध्ये धार्मिक कार्य घडेल. नवीन वास्तुखरेदी किंवा गृहसजावटीचे योग आहेत. कुटुंबवृद्धी होऊ शकते. मित्रपरिवाराचा सल्ला ऐकून स्वतःच्याच मनाप्रमाणे निर्णय घ्यावा. भावंडांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. जोडीदार कामामध्ये व्यस्त राहील.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन योजना तुम्हाला प्रत्यक्षात उतरवता येतील. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. तुम्हाला लोकप्रियता मिळेल. हितशत्रू, स्पर्धक कार्यरत होणार आहेत. जशास तसे वागणे योग्य ठरेल. मात्र नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** २६, २८.

## ● तूळ

**आठवड्याची** सुरुवात लाभाने होईल. एकंदरीत हा आठवडा चांगला जाईल. राशीस्वामी शुक्रामुळे भाग्याची साथ मिळणार आहे. आत्मविश्वास चांगला ठेवा. घाईगडबडीत, अतिधाडसी निर्णय घेऊ नये. जिद्द व अट्टाहास यातील फरक लक्षात ठेवा. रागावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवा. संचित धन वाढेल. प्रवासाचे योग आहेत. थोडे अडथळे आले तरी त्यावर मार्ग निघेल. मनामध्ये अस्वस्थता राहील.

कौटुंबिक आघाडी सांभाळावी लागेल. मतभेद, वादविवाद टाळण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आक्रमक वृत्ती त्रासदायक ठरेल. जोडीदाराचे वर्चस्व राहील. संततीबरोबर सुसंवाद ठेवा. वारसा हक्क, वडिलोपार्जित स्थावर यासंबंधीचे प्रश्न योग्य रीतीने हाताळावे लागतील. आवश्यक तिथे अनुभवी, ज्येष्ठ व्यक्तीची मदत घ्यावी.

कार्यक्षेत्रामध्ये कष्टामध्ये वाढ होणार आहे. संयम राखा. नवीन व्यवहारात कायदेशीर बाजू तपासा. तुमची प्रतिष्ठा सांभाळावी. नोकरदारांनी वरिष्ठांशी मतभेद होणार नाही यासाठी सावधगिरी बाळगावी. भागीदाराचे वर्चस्व राहील. कलाकारांसाठी चांगला काळ आहे. नवीन संधी मिळतील.

आरोग्याच्या छोट्या तक्रारींकडेही वेळेस लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** २४,२५, २७

## ● वृश्चिक

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच कामाचे नियोजन करून कृतीला सुरुवात करावी. मनाचा उत्साह टिकवून ठेवावा लागेल. विचार करण्यामध्ये फार वेळ घालवू नका. तुमच्यामध्ये ऊर्जा, धडाडी चांगली राहणार आहे. आक्रमक वृत्ती व रागावर नियंत्रण ठेवा. आलेल्या अपयशातून पुन्हा उभे राहण्याचा तुमचा गुण कायम ठेवा. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. जुनी येणी वसूल होतील. आर्थिक गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्याने व कमी प्रमाणात करावी. नाहीतर पैसा अडकून पडेल.

घरामधील वातावरण चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. जोडीदाराशी बौद्धिक मतभेद संभवतात. अहंकार त्रासदायक ठरेल. मुलांचे हट्ट पुरवताना तारांबळ उडेल. वडिलोपार्जित संपत्तीचे प्रश्न मार्गी लावता येतील. आवश्यक तेव्हा माघार घ्यावी लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन प्रकल्प, कल्पना प्रत्यक्षात राबवता येतील. त्यासाठी पूर्ण तयारीनिशी सुरुवात करावी. स्वबळावर कामे पूर्ण करावी लागतील. प्रतिस्पर्धी, हित शत्रूला जशास तसे उत्तर द्यावे लागेल. नोकरदारांना पुढाकार घेऊन योजना पूर्ण कराव्या लागतील. वरिष्ठांच्या मदतीची अपेक्षा ठेवू नका. तुमच्या कष्टाचे, प्रयत्नांचे फळ नंतर मिळणार आहे.

**शुभ दिनांक :** २४, २५, २६.

## ● धनु

**आठवड्याची** सुरुवात काहीशी कंटाळवाणी वाटेल. नंतर उत्साह वाढेल. मानसिकता स्थिर ठेवून निर्णय घ्यावेत. आठवड्याचा उत्तरार्ध महत्त्वाच्या कामांसाठी योग्य आहे. त्याची साथ असली तरीही श्रमाला पर्याय नाही. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. आर्थिक गुंतवणूक मात्र अतिशय सावधगिरीने करावी. कुठल्याही मोहाला, आमिषाला बळी पडू नका. व्यावसायिक प्रगती चांगली होईल. कामानिमित्त तसेच कौटुंबिक सहल असे प्रवास होऊ शकतात. नवीन ज्ञान, माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न कराल. त्याचा व्यवहारात उपयोग होईल.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. ज्येष्ठांच्या आरोग्याच्या समस्या राहतील. त्याचवेळी नवीन वास्तुखरेदी, गृहसजावट याचेही योग आहेत. मित्रपरिवार व कुटुंबाबरोबर छोटा समारंभ साजरा होईल. मुलांची मानसिकता जपावी. जोडीदाराशी सुसंवाद ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञान उपयोगी ठरणार आहे. कामाचा वेग वाढवावा लागेल. नोकरदारांनी अहंकार बाजूला ठेवून कामावर लक्ष केंद्रित करावे. बुद्धीचातुर्याने परिस्थिती हाताळावी. कामाचे स्वरूप बदलू शकते. भागीदारीतील व्यावसायिकांना यश मिळेल.

आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता वेळीच उपाययोजना करावी.

**शुभ दिनांक :** २६, २८, २९.

## ● मकर

**आठवड्याचा** उत्तरार्ध चांगला ठरेल. सुरुवात थोडी अडचणीने होईल. मनामध्ये नैराश्य, विरक्तीचे भाव जाणवू शकतात. त्यामुळे तुमचा उत्साह टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. मनाविरुद्ध घटना घडल्या तरी संयम ठेवा. कामामध्ये सातत्य अत्यंत आवश्यक आहे. अनेक आघाड्यांवर लढावे लागेल. तुमची ताकद, ऊर्जा योग्य ठिकाणी वापरावी. आर्थिक आवक चांगली राहील. आर्थिक गुंतवणूक करण्यासाठी योग्य काळ आहे. मात्र तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. तुमच्याकडून चुका होऊ नयेत यासाठी विशेष सावधगिरी बाळगावी.

घरामध्ये थोडे तप्त वातावरण राहील. जोडीदाराशी वाद टाळा. मुलांसाठी तसेच मौजमजेसाठी अनावश्यक खर्च होऊ शकतो. संततीच्या प्रगतीच्या दृष्टीने काही ठोस निर्णय घ्यावे लागतील. कुटुंबामध्ये तुमच्या बोलण्यामुळे गैरसमज होऊ शकतो. सुसंवाद ठेवा

कार्यक्षेत्रामध्ये प्रगती होईल. स्पर्धकांवर अंकुश ठेवता येईल. शांत चित्ताने समस्यांवर मार्ग शोधावा. नियमानुसार काम करावे. नोकरदारांना नोकरीत बदल करण्याच्या दृष्टीने नवीन संधी मिळू शकते. तुमच्या कामाचे श्रेय तुम्हाला मिळेल. काही प्रमाणात धनलाभ होऊ शकतो. कामाची पूर्तता करताना धावपळ होणार आहे.

शुभ दिनांक : २८, २९.

## ● कुंभ

**महत्त्वाचे** काम आठवड्याच्या पूर्वार्धात करून घ्या. नंतर अडथळ्यांचा सामना करावा लागेल. कष्टाला पर्याय नाही. मनामध्ये असलेली अस्वस्थता नियंत्रणात ठेवा. तुमच्या पराक्रमाला वाव मिळणार आहे. विचारपूर्वक पाऊल उचलावे. भाग्याची साथ मिळणार आहे. नवीन ज्ञान मिळवण्याची इच्छा होईल. या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करून घ्यावा. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. बचतीला प्राधान्य द्यावे. आर्थिक गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्याने व मोठ्या काळासाठी करावी.

कुटुंबासाठी खर्चाची तरतूद करावी लागेल. घरामध्ये मिश्र वातावरण राहील. घरातील शांत, आनंदी वातावरण दूषित होणार नाही यासाठी तुम्हाला पुढाकार घ्यावा लागेल. छोटा समारंभ साजरा होईल. वास्तुमुळे फायदा होताना दिसत आहे. घरातील ज्येष्ठांचा मान राखा. जोडीदाराचा सल्ला, मत विचारात घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये छुपे शत्रू त्रासदायक ठरतील. तुमच्या योजना गुप्त ठेवा. व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. नवीन व्यवहार होतील. स्वबळावर कामाचा ठसा उमटवाल. मात्र पैसा अडकून पडणार नाही यासाठी सावध रहा.

मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** २४, २५.

## ● मीन

सध्याचे ग्रहमान बघता तुमची मनस्थिती जपणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या कामांसाठी आठवड्याचा पूर्वार्ध योग्य राहील. आर्थिक बाबतीत फसवणूक होणार नाही याकडे लक्ष द्या. बचत करणे योग्य राहील. बोलताना काळजी घ्यावी. योग्य वेळेत निर्णय घेऊन कृतीला प्राधान्य द्या. लढाऊ वृत्ती उपयोगी पडेल. कामामध्ये संयम व सातत्य ठेवावे लागेल. सर्व आघाड्यांवर तुम्हाला लक्ष द्यावे लागणार आहे.

घरामधील वातावरण चांगले राहील. अनावश्यक खर्चावर मात्र नियंत्रण ठेवा. कुटुंबातील मतभेद टाळण्यासाठी सुसंवाद योग्य ठरेल. सौम्य भाषेचा उपयोग करा. कौटुंबिक व्यवसायात यश मिळणार आहे. जोडीदारासाठी आवर्जून वेळ काढा. मुलांबरोबर वादाचे प्रसंग येऊ शकतात.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन व्यवहार होतील. सरकारी, प्रतिष्ठित संस्थांबरोबर काम करायला मिळेल. मात्र व्यावहारिक बाजू विसरू नका. कायदेतज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा. नोकरदारांना वरिष्ठांच्या मदतीमुळे फायदा होईल. स्पर्धात्मक परिस्थितीला तोंड देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** २४, २५, २६

**- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे**

नवाकाळ

• पुणे | रविवार २४ मे, २०२६ • पान -८

# ट्रम्प कन्या इव्हांकाच्या हत्येचा कट इराणी दहशतवाद्याला तुर्कीत अटक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ वॉशिंग्टन

**इराणच्या** इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स कडून प्रशिक्षण घेतलेल्या एका दहशतवाद्याने इव्हांका ट्रम्प यांना ठार मारण्याचा कट रचल्याची माहिती समोर आली आहे. २०२० मध्ये अमेरिकेच्या ड्रोन हल्ल्यात इराणी लष्करी अधिकारी कासेम सुलेमानी यांचा मृत्यू झाल्याचा बदला घेण्यासाठी हा कट आखण्यात आला होता.

हा कट दहशतवाद्याला तुर्कीमध्ये अटक झाल्यानंतर उघडकीस आला व नंतर त्याला अमेरिकेत पाठवण्यात आले आहे. हा कट डोनाल्ड ट्रम्प



यांच्या कार्यकाळातील घटनांशी संबंधित असल्याचे सांगितले जाते. ३२ वर्षीय इराकी नागरिक मोहम्मद बाकर साद दाऊद अल-सादी याने इव्हांका ट्रम्प यांच्या फ्लोरिडातील घराचा नकाशा मिळवला होता, अशी माहिती तपासात समोर आली. त्याने सोशल मीडियावर, बदला हा फक्त वेळेचा प्रश्न आहे असा इशाराही दिला होता. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, अल-सादीचा संबंध दहशतवादी कारवायांशी व इराण समर्थित संघटनांशी आहे. तो लहानपणापासून इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सच्या प्रशिक्षणाशी संबंधित होता व नंतर अनेक हिंसक घटनांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा संशय आहे.

# दहावीच्या प्रश्नपत्रिका केंद्रावर दोन तास आधी ऑनलाईन मिळणार

■ मुंबई

**नीट** परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणानंतर राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीच्या परीक्षा प्रक्रियेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. आता दहावीच्या प्रश्नपत्रिका थेट परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने पाठवण्यात येणार असून, परीक्षा सुरू होण्याच्या केवळ दोन तास आधी त्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या नव्या प्रणालीची अंमलबजावणी आगामी जून महिन्यात होणाऱ्या दहावीच्या पुरवणी परीक्षेपासून पथदर्शी प्रकल्प म्हणून केली जाणार आहे. प्रश्नपत्रिका अत्यंत सुरक्षित डिजिटल प्रणालीद्वारे परीक्षा केंद्राच्या मुख्य संगणकावर पाठवली जाईल. पेपर सुरू होण्याच्या दोन तास आधीच संबंधित लिंक सक्रिय होईल. त्यानंतर केंद्रावरच प्रश्नपत्रिकांच्या प्रती छापून विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येतील.

या प्रणालीमुळे ट्रेझरी किंवा वाहतुकीदरम्यान होणाऱ्या पेपरफुटीच्या पारंपरिक प्रकारांना आळा बसेल, असा दावा मंडळाकडून करण्यात आला आहे. डिजिटल लॉकिंग सिस्टम आणि ट्रॅकिंग तंत्रज्ञानामुळे संपूर्ण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि सुरक्षितता निर्माण होणार आहे. सुरुवातीला पुण्यातील २४ परीक्षा केंद्रांवर एका विषयाच्या प्रश्नपत्रिकेसाठी हा प्रयोग राबवण्यात येणार आहे.

# यूपीएससी २०२७ च्या परीक्षांचे कॅलेंडर जाहीर

■ पुणे

**केंद्रीय** लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) वर्ष २०२७ साठीचे अधिकृत परीक्षा कॅलेंडर जाहीर केले आहे. आयएएस, आयपीएस, आयएफएस, एनडीए, सीडीएस,



अभियांत्रिकी सेवा, सीएपीएफसह तब्बल २७ परीक्षा आणि भरती प्रक्रियांच्या तारखा घोषित करण्यात आल्या आहेत. या वेळापत्रकामुळे लाखो स्पर्धा परीक्षार्थ्यांना तयारीचे नियोजन करण्यास मोठी मदत होणार आहे.

आयोगाने परीक्षा, अधिसूचना प्रसिद्ध होण्याची तारीख, अर्ज करण्याची अंतिम मुदत आणि मुख्य परीक्षांचे वेळापत्रक एकाच वेळी जाहीर केले आहे. आयोगाच्या वेळापत्रकानुसार, संयुक्त भू-वैज्ञानिक पूर्वपरीक्षा १० जानेवारी २०२७ रोजी होणार आहे. त्यानंतर १३ जानेवारी रोजी यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२७ ची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. नागरी सेवा परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख २ फेब्रुवारी २०२७ निश्चित करण्यात आली आहे. अभियांत्रिकी सेवा (पूर्व) परीक्षा ३१ जानेवारी २०२७ रोजी होणार आहे. संरक्षण क्षेत्रातील प्रतिष्ठित राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) आणि नौदल अकादमी (एनए) परीक्षा (१) तसेच संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षा (१) या दोन्ही परीक्षा ११ एप्रिल २०२७ रोजी पार पडणार आहेत. यूपीएससी नागरी सेवा पूर्व परीक्षा २३ मे २०२७ रोजी होणार असून, त्यानंतर २० ऑगस्ट २०२७ पासून मुख्य परीक्षेला सुरुवात होणार आहे. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांमधील अधिकारी पदांसाठी घेतली जाणारी सीएपीएफ परीक्षा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

# पेट्रोल पंपवरील कर्मचारी निघून गेले पालकमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतर विक्री सुरू

■ छत्रपती संभाजीनगर

**राज्यातील** डिझेल टंचाईचे संकट अधिकाधिक गंभीर होत चालले आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना डिझेल मिळत नसल्याने संताप व्यक्त होत असून, काही ठिकाणी निदर्शनेही होत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शहाजापूर येथे पेट्रोल पंपावर डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांचा संताप उसळल्यावर पालकमंत्री संजय शिरसाट यांना स्वतः जाऊन पेट्रोल विक्री सुरू करण्याचा इशारा द्यावा लागला.

शहाजापूर येथे काल रात्रीपासून शेतकरी मोठ्या प्रमाणावर रांगा लावून डिझेलची प्रतीक्षा करत होते. आज सकाळी डिझेल विक्री सुरू झाल्यावर काही वेळातच ते संपले. डिझेल साठा संपला आहे का? असे शेतकऱ्यानी विचारल्यावर पंप कर्मचाऱ्यांनी पळ काढला. या प्रकरणाची माहिती मिळताच पालकमंत्री संजय शिरसाट यांनी पेट्रोल पंपाला भेट देऊन पाहणी केली. मात्र त्यांना उत्तर द्यायला पंपावरील व्यवस्थापक आणि कर्मचारीच तिथे नव्हते. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून चौकशीचे आदेश दिले आणि शेतकऱ्यांना डिझेल न देणाऱ्या पंपांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. या हस्तक्षेपानंतर अवघ्या एका तासात पंपावर डिझेल विक्री पुन्हा सुरू करण्यात आली.

हिंगोली, वाशिम, बुलडाणा, हिंगोली, जळगाव आणि जालना जिल्ह्यांमध्ये अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांब रांगा लागल्या असून, काही शेतकऱ्यांना ट्रॅक्टरवरच रात्र काढावी लागत आहे.

## शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा

पावसाळा सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीची मशागत करून जमीन पेरणीसाठी तयार ठेवावी लागते. त्यासाठी शेतकरी छोटा ट्रॅक्टर वापरतो, पण आता त्या ट्रॅक्टरमध्ये भरायला डिझेलच मिळेनासे झाले आहे. शेतकरी



तीन तीन दिवस पेट्रोल पंपावर रांग लावून उभे आहेत. त्यांची ही अवस्था असताना नेते आरोप करीत आहेत की शेतकरी इंधनाची साठवणूक करीत असल्याने तुटवडा निर्माण झाला आहे. यावर संतप्त होऊन शेतकरी म्हणाला की, आमच्याकडे आताच डिझेल घ्यायला पैसा नाही तर साठवणूक कसली करणार आहोत. साठवणूक होऊ नये म्हणून सरकारने आधी ट्रॅक्टर असल्याचा पुरावा दिला तरच डिझेल देऊ असे फर्मान काढले. हेही शेतकऱ्यांनी मान्य केले, पण आता नवा आदेश दिला आहे की, अधिकृत मान्य कॅन मधूनच डिझेल दिले जाईल. या कॅनचा फोटोही प्रसारित केला आहे. यामुळे शेतकरी प्रचंड चिडला आहे. आम्ही आता हे कॅन शोधत बसायचे का? हे कॅन कुठे मिळतात ते सांगितलेले नाही. दोन ते सहा हजाराला कॅन आहे म्हणतात. पेट्रोल पंपावरील रांग सोडून आता कॅन शोधत फिरायचे ही शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे.

# हार्वर्डमध्ये आता फक्त २० टक्के विद्यार्थ्यांनाच 'ए ग्रेड' मिळणार

■ हार्वर्ड

**जगातील** प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक असलेल्या हार्वर्ड विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या ग्रेडिंग पद्धतीत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२७ पासून पदवीपूर्व अभ्यासक्रमांमध्ये कोणत्याही वर्गात केवळ २० टक्के विद्यार्थ्यांनाच 'ए' ग्रेड दिली जाणार आहे. वाढत्या ग्रेड इन्फ्लेशनमुळे म्हणजेच जास्त विद्यार्थ्यांना सर्वोच्च श्रेणी मिळत असल्याने हा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या बैठकीत या प्रस्तावाला बहुमताने मंजुरी देण्यात आली. ४५८ प्राध्यापकांनी या निर्णयाच्या बाजूने मतदान केले, तर २०१ जणांनी विरोध केला. विद्यापीठ प्रशासनाचे म्हणणे आहे की, सर्व विद्यार्थ्यांना उच्च श्रेणी मिळू लागल्याने असाधारण प्रतिभा ओळखणे कठीण झाले. हार्वर्डमध्ये २००५ साली सुमारे २४ टक्के विद्यार्थ्यांना 'ए' ग्रेड मिळत होती. मात्र २०२५ पर्यंत हा आकडा ६० टक्क्यांहून अधिक झाला. मागील शैक्षणिक सत्रात सर्वोच्च श्रेणीसाठी तब्बल ५५ विद्यार्थी बरोबरीत होते. त्यामुळे खरा टॉपर कोण, हा प्रश्न निर्माण झाला होता. फक्त हार्वर्डच नव्हे, तर इतर अमेरिकन विद्यापीठांमध्येही अशीच परिस्थिती आहे. येल विद्यापीठमध्ये 'ए'आणि 'ए' मायनस' ग्रेडचे प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत पोहोचले, तर ब्राऊन विद्यापीठमध्ये दोन तृतीयांश विद्यार्थी 'ए' श्रेणीत होते.

# नाशिक टीसीएस धर्मांतर प्रकरणी १५०० पानांचे आरोपपत्र दाखल

■ नाशिक

**नाशिकमधील** बहुराष्ट्रीय आयटी कंपनी टीसीएसशी संबंधित महिला कर्मचाऱ्यांच्या कथित लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणात नाशिक पोलिसांनी मोठी कारवाई करत न्यायालयात तब्बल १,५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात पीडितेचे नाव बदलण्यासाठी तिची मूळ कागदपत्रे हिसकावून घेणे, धार्मिक भावना दुखावणे आणि सक्तीच्या धर्मांतराचा प्रयत्न अशा अनेक गंभीर बाबींचे पुरावे तपासात उघडकीस आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या गुन्ह्यात दानिश एजाज शेख, तौसिफ बिलाल अत्तार, निदा एजाज खान आणि एमआयएमचे माजी नगरसेवक मतीन माजिद पटेल यांच्याविरोधात नाशिक रोड न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले आहे. या सर्व आरोपींवर लैंगिक छळ, धर्मांतर आणि अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली होती. या पथकाने सखोल तपास करत महत्त्वाचे डिजिटल, तांत्रिक आणि दस्तऐवजी पुरावे गोळा केले आहेत.

तपासादरम्यान पोलिसांनी १७ महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवले. याशिवाय पीडिता आणि आरोपींच्या मोबाईलमधील व्हॉट्सअॅप चॅट, स्क्रीनशॉट्स, ईमेल ट्रेल्स आणि सोशल मीडिया संवाद यांचाही तपास करण्यात आला.

# खासगी शिक्षकांना जनगणनेची सक्ती का? कोर्टाचा सवाल

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** ५०० हून अधिक खासगी विनाअनुदानित आणि अल्पसंख्याक शाळांमधील शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी सक्तीने नियुक्त करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. खासगी शाळांमधील शिक्षकांना जनगणना करण्याची ड्युटी सक्तीची का? असा खडा सवाल उच्च न्यायालयाने सरकारला विचारला आहे. उच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी ३१ जुलै रोजी होणार आहे.

मुंबईतील विनाअनुदानित शाळा फोरम, विविध संघटना आणि शाळा व्यवस्थापनांनी यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्या. गौतम अंखड आणि न्या. संदेश पाटील यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान खंडपीठाने राज्य सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

# मध्य रेल्वेवर आज मेगा ब्लॉक हार्बर मार्गावरील अनेक सेवा रद्द

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या मुंबई विभागात विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी रविवारी मुख्य आणि हार्बर मार्गावर मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे अनेक उपनगरीय सेवा रद्द करण्यात येणार असून, काही लोकल गाड्या वळविण्यात येणार आहेत. परिणामी प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे.

मुख्य मार्गावर माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.५५ या वेळेत मेगा ब्लॉक राहणार आहे. या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून सकाळी १०.१४ ते दुपारी ३.३२ दरम्यान सुटणाऱ्या डाऊन धीम्या मार्गावरील लोकल गाड्या माटुंगा ते मुलुंडदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील. या गाड्या शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप आणि मुलुंड स्थानकांवर थांबतील. या सेवा सुमारे १५ मिनिटे उशिराने धावतील. ठाणे येथून सकाळी ११.०७ ते दुपारी ३.५१ दरम्यान सुटणाऱ्या अप धीम्या मार्गावरील सेवा मुलुंड ते माटुंगा दरम्यान अप जलद मार्गावर वळविण्यात येणार आहेत. या गाड्या मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला आणि शीव येथे थांबतील. त्यानंतर त्या माटुंगा येथे पुन्हा धीम्या मार्गावर येतील. हार्बर मार्गावरही मेगा ब्लॉकचा परिणाम होणार आहे.

# पंतप्रधान मोदी-रुबिओ चर्चा व्हाईट हाऊस भेटीचे निमंत्रण

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्यासोबत सुरक्षा आणि व्यापार विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा केली. यावेळी रुबिओ यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या वतीने पंतप्रधान मोदींना व्हाईट हाऊस भेटीचे निमंत्रण दिले. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारत-अमेरिका संबंधांमध्ये व्यापार तणावामुळे चढ-उतार सुरू असताना रुबिओ यांचा हा तीन दिवसांचा भारत दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

मार्को रुबिओ यांच्यासोबत झालेल्या बैठकीत अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर हेही उपस्थित होते. या चर्चेत इंडो-पॅसिफिक क्षेत्राचाही समावेश होता. सुरक्षा, व्यापार आणि महत्त्वाच्या तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये अमेरिका-भारत सहकार्य अधिक मजबूत करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. भारत हा अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचा भागीदार देश आहे, असे सर्जिओ गोर यांनी सोशल मीडियावर म्हटले. त्यांनी पंतप्रधान मोदींना लवकरच व्हाईट हाऊसला भेट देण्याचे निमंत्रण देण्यात आल्याचेही सांगितले. पंतप्रधान मोदी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, प्रादेशिक आणि » पान २ वर

# शिर्डीत बनणार ३०० किमीपर्यंतची क्षेपणास्त्रे

■ शिर्डी

**देशाचे** संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शिर्डी येथे 'निबे डिफेन्स प्रॉडक्शन कॉम्प्लेक्स'च्या क्षेपणास्त्र संकुल आणि तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन पार पडले. या प्रकल्पात १५० किमी ते ३०० किमी पल्ल्यापर्यंत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांची निर्मिती करण्यात येणार आहे.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजक गणेश निबे यांच्या कर्तृत्वाचा विशेष गौरव केला. देशाच्या सुरक्षेसाठी

## प्रकल्पाचे उद्घाटन

निबे यांनी केलेले कार्य महाराष्ट्र आणि संपूर्ण देशासाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. ते म्हणाले



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वंदे भारत एक्स्प्रेसने शिर्डीला

की, महाराष्ट्राच्या मातीतील एका युवकाने संरक्षण क्षेत्रात उभे केलेले काम संपूर्ण देशासाठी गौरवास्पद आहे. आपल्याकडे ७० किमी रेंजपासून थेट ४००-५०० किमी रेंजपर्यंत मारा करणारी शस्त्रे उपलब्ध नव्हती. हा मोठा तांत्रिक उणीव भरून काढण्याचे काम गणेश निबे यांनी केले आहे. निबे यांनी १५० किमी आणि ३०० किमी रेंजपर्यंत अचूक मारा करू शकणारी स्वदेशी शस्त्रे तयार करून भारताच्या सामर्थ्यात भर घातली आहे. पूर्वी आपण शस्त्रास्त्रांसाठी पूर्णपणे आयातीवर अवलंबून होतो. मात्र आज आपण जगातील सर्वोत्तम ड्रोन आणि मिसाईल भारतात तयार करत आहोत. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न आज सत्यात उतरताना दिसत आहे.

# ११वी प्रवेशाचा सर्व्हर डाऊन अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

■ मुंबई

राज्यातील अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर दोन दिवस तांत्रिक बिघाड झाल्याने विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडाली. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने अर्ज भरण्यासाठी २५ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. वारंवार सर्व्हर डाऊन होत असल्याने पालक व विद्यार्थी त्रस्त झाले असून, प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ वाढत आहे.

सध्या अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी सुरू असून, विद्यार्थ्यांना पसंतीच्या महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्याचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा सुरू आहे. २१ मेपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेसाठी २३ मेपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, तांत्रिक अडचणींचा हजारो विद्यार्थी आणि पालकांना फटका बसला. नेट कॅफे, ऑनलाईन सेवा केंद्रे येथे सकाळपासूनच विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत होते. मात्र वेबसाईट वारंवार बंद पडणे, सर्व्हर डाऊन होणे, लॉगिन न होणे, माहिती सेव्ह न होणे, ओटीपी उशिरा येणे अशा समस्यांमुळे प्रवेश अर्ज पूर्ण करण्यात अडथळे निर्माण झाले. परिणामी दिवसभरात अपेक्षित अर्ज भरले गेले नाहीत.

# इंजिन बिघाडानंतरही शक्तिशाली रॉकेट हिंदी महासागरात सुरक्षित उतरले

**जगातील सर्वात शक्तिशाली मानल्या जाणाऱ्या स्टारशिप रॉकेटची १२ वी चाचणी टेक्सासमध्ये पार पडली. यावेळी स्टारशिपच्या नवीन आणि अधिक प्रगत व्ही-३ आवृत्तीची ही पहिलीच चाचणी होती. या मोहिमेत काही तांत्रिक अडचणी आल्या असल्या तरी रॉकेटने हिंदी महासागरात सुरक्षित लँडिंग करण्यात यश मिळवले.**

■ टेक्सास

**एलन मस्क** यांच्या स्पेस एक्स कंपनीने तयार केलेल्या या रॉकेटचे प्रक्षेपण



टेक्सासमधील स्टारबेस प्रक्षेपण केंद्रावरून करण्यात आले. उड्डाणानंतर काही वेळातच इंजिनमध्ये बिघाड झाला. त्यामुळे रॉकेट नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र सुमारे एका तासानंतर स्टारशिप स्पेसक्राफ्ट हिंदी महासागरात सुरक्षित उतरले. स्टारशिप रॉकेटची उंची सुमारे ४०३ फूट आहे. हे रॉकेट पूर्णपणे पुनर्वापर करता येईल, अशा पद्धतीने बनवण्यात आले आहे. स्टारशिपचा वरचा भाग 'स्पेसक्राफ्ट' तर खालचा भाग 'सुपर हेवी बूस्टर' म्हणून ओळखला जातो. या चाचणीत सुपर हेवी बूस्टरचे 'बूस्ट बॅक बर्न' पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे त्याचे नियंत्रित लँडिंग करण्यात अडचणी आल्या. तसेच मुख्य स्टारशिप स्पेसक्राफ्टच्या सहा इंजिनांपैकी एक इंजिन सुरू झाले नाही. त्यामुळे रॉकेट नियोजित कक्षेत पूर्णपणे पोहोचू शकले नाही.

# वांद्रे गरीबनगर अतिक्रमण हटाव कारवाई पाचव्या दिवशीही सुरूच

■ मुंबई


**वांद्रे** पूर्व येथे पश्चिम रेल्वेच्या जागेवरील अनधिकृत झोपड्या हटवण्याचे काम आज सलग पाचव्या दिवशी सुरू होते. मात्र बहुतांश पाडकाम कालच पूर्ण झाल्याने आज बुलडोझरचा वापर करण्यात आला नाही. याबाबत माहिती देताना पश्चिम रेल्वेचे प्रवक्ते विनीत अभिषेक यांनी सांगितले की, येथील अनधिकृत बांधकामे पाडण्याचे बहुतांश काम पूर्ण करण्यात आले. आता न्यायालयाच्या आदेशानुसार शंभर बांधकामे सुरक्षित ठेवायची आहेत. त्या बांधकामांचे वरचे मजले पाडायचे काम आज करण्यात आले. खालच्या सांगाड्याला धक्का न पोहोचवता हे काम करायचे असल्याने आज बुलडोझरचा वापर करण्यात आला नाही. पाडलेल्या बांधकामांचे अवशेष हटवण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर येथे कुंपण घालण्यात येणार आहे.

# कांद्याला ३.८० रुपये भाव श्रीरामपुरात शेतकरी आक्रमक

**मोदींना गुजराती भाषेत पत्र**

■ अहिल्यानगर

**कांद्याच्या** दरघसरणीमुळे राज्यातील शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटात सापडले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांद्याला १२ रुपये ३५ पैसे प्रति किलो दर देण्याचे आश्वासन देऊनही अहिल्यानगरच्या श्रीरामपूर बाजार समितीत कांद्याला केवळ ३ रुपये ८० पैसे प्रति किलो भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात संस्थेने गुजराती भाषेत थेट पंतप्रधानांना पत्रही पाठवले आहे. उत्पादन



खर्चही निघत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. युवा किसान सामाजिक संस्थेने, कांद्याला योग्य भाव मिळत नसेल तर शेतीच्या जमिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर करून देऊ, असा इशारा मोदी यांना पाठवलेल्या पत्रात दिला आहे. श्रीरामपूर बाजार समितीत शेतकरी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेत बाजार समिती प्रशासनाला धारेवर धरले. व्यापाऱ्यांकडे कांद्याचा ग्रेडर म्हणजे आकारानुसार प्रतवारी करणारे यंत्र नसल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला.